नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १६४ * * अमरावती * बुधवार, दिनांक १७ डिसेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## लूथरा बंधूंना थायलंडमधून दिल्लीला आणले

### गोवा क्लब अग्निकांड

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६ :**
गोवा येथील 'बिर्च बाय रोमियो लेन' या नाईट क्लबमधील आग प्रकरणात मुख्य आरोपी सौरभ लूथरा आणि गौरव लूथरा यांना थायलंडमधून दिल्लीला आणण्यात आले आहे.
भारतीय सुरक्षा अधिकारी मंगळवारी दुपारी सुमारे २ वाजता दोन्ही भावांसह इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले. गोवा पोलिसांच्या एका पथकाने दोघांना विमानतळावरच अटक केली. आता त्यांना पटियाला हाऊस न्यायालयात ट्रान्झिट रिमांडसाठी हजर केले जाईल. ट्रान्झिट रिमांडची परवानगी मिळताच पोलीस दोघांना घेऊन गोव्याला जातील.

अग्रलेख

## खरीखरी..

# मानवतेला कलंक

आज मनाला विदीर्ण करणारी एक बातमी आमच्या समोर आली आहे. वर्तमानपत्रात दररोज बऱ्यावाईट स्वरूपाच्या बातम्या छापून येतच असतात. भूकंप झाला हजार ठार, विमान पडले २०० ते २५० ठार, रेल्वे अपघातामध्ये शंभर सव्वाशे ठार, दोन बसच्या अपघातामध्ये ८० ते ९० ठार किंवा बॉम्बस्फोट झाला इतके ठार, अंदाधुंद गोळीबार झाला तितके ठार अशा बातम्या वाचून आणि छापून वर्तमानपत्राचे आम्ही सारे संपादक बधीर झालेले असतो. आज एकमात्र अशी बातमी आली आहे की जे वाचल्यावर आम्ही वर म्हटल्याप्रमाणे अक्षरशः क्रोध, हतबलता माणसाची क्रूरता आणि माणसाचे हरवलेले माणूसपण या सगळ्या गोष्टींचे संमिश्रण मनात कालवाकालव करीत आहे अशा प्रकारची ही बातमी आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील एका गावात एक शेतकरी आहे त्याच्या डोक्यावर मोठे कर्ज होते. ज्याच्या डोक्यावर कर्ज नाही तो शेतकरीच नाही असे म्हटले तरी चालेल. कारण शेतकरी आहे म्हणजे कर्ज असणारच त्यात शंका घेण्याचे कारणच नाही आणि ज्याच्या डोक्यावर कर्ज नाही तो शेतकरीच नाही असे म्हटले तरी चालेल. या शेतकऱ्याने फक्त एक लाखाचे घेतलेले कर्ज कालांतराने ७३ लाखापर्यंत गेले. त्याने स्वतःचा ट्रॅक्टर विकला, जनावरे विकली, घरातील बऱ्यापैकी किडूकमिडूक मिळून सामान विकले. परंतु कर्ज फिटले नाही. अशा या शेतकऱ्याचे असलेले कर्ज फेडण्यासाठी एका कर्जफेड एजंटाने उपाय शोधला. त्या बिचाऱ्या कर्जबाजारी शेतकऱ्याला बहुधा सावकाराच्या चिथावणी मुळे एका एजंटाकडून एक प्रस्ताव देण्यात आला. त्या प्रस्तावात संबंधित शेतकऱ्याने आपली किडनी दिली तर त्याला आठ लाख रुपये मिळतील असे सांगण्यात आले. मग एका किडनीवरही ठणठणीत जीवन जगता येते, असे त्याला सांगून, दाखवून किंवा पटवून याच महाचलाख एजंटाने एक नामी उपाय शोधला. या बिचाऱ्या कर्जबाजारी शेतकऱ्याला बहुदा सावकाराच्या तगाद्यामुळे हा प्रस्ताव देण्यात आला. या प्रस्तावामध्ये संबंधित शेतकऱ्याने आपली एक किडनी दिली तर त्याला आठ लाख रुपये मिळतील असे सांगण्यात आले. कित्येक लोक फक्त एका किडनीवर जगत आहेत हे त्याला पटवण्यात आले. यामुळे आपले काही कर्ज फिटेल आपल्या हातात दोन पैसे शिल्लक उरतील आणि भविष्यात कुटुंबाला सुखाचे दिवस येतील या आशेने त्या भाबड्या शेतकऱ्याने या गोष्टीला मान्यता दिली. मग त्या एजंटने शेतकऱ्याला विदेशवारी घडवीत कंबोडियाला नेले तिथे त्याची एक किडनी काढण्यात आली. झालेल्या ठरावाप्रमाणे शेतकऱ्याला ८ लाख रुपये मिळालेच नाहीत ते पैसे कदाचित परस्पर कर्ज देणाऱ्या सावकाराने गिळले असावेत किंवा सावकार आणि एजंट यांनी संगनमत करून ते पैसे लाटले असावेत. ज्या शेतकऱ्याने आपल्या संसारासाठी आपली बहुमूल्य किडनी दान दिली त्याची तब्येत सध्या बिघडलेली आहे, परंतु आता तब्येत खालवल्यामुळे उपचारासाठी त्याच्याकडे पैसे नाहीत. अशावेळी पैशासाठी दुसरी किडनी देता येत नाही. मग आम्हाला सांगा, या गरीब बिचाऱ्या शेतकऱ्याने आता काय करावे, अशा प्रकारे अवयव खरेदी करणे हा फार मोठा गुन्हा आहे. हा गुन्हा भारतात झाला नाही तो कंबोडियात म्हणजेच विदेशात झालेला आहे. म्हणजे तो आंतरराष्ट्रीय गुन्हा आहे या गुन्ह्यासाठी भारतामध्ये शिक्षेची मोठी तरतूद आहे मग हा कर्जबाजारी आणि गरीब शेतकरी परदेशात कसा गेला. तत्पूर्वी त्याला गप्प राहण्यासाठी कोणी पटवले याची चौकशी झालीच पाहिजे. आज त्या शेतक?याला उपचारासाठी मदतीची गरज आहे त्याचे ठरलेले पैसे त्याला मिळाले असते तर त्याच्यावर ही पाळीच आली नसती. मग प्रश्न असा आहे की शेतक?याला मिळणारे आठ लाख रुपये कुठे गेले. खास त्यासाठीच यामध्ये सावकार, एजंट आणि त्यांच्याबरोबर आणखी कोणकोण होते याचाही छडा लावलाच पाहिजे. चंद्रपूर जिल्ह्यात अवयव चोरीचे रॅकेट तर नाही ना, त्याचीही चर्चा होणे गरजेचे आहे. खरेतर एक फार साधी गोष्ट आहे ती सगळ्यांनाच कळेल, ती म्हणजे शेतकऱ्याला स्वतः जगण्यासाठी आणि कुटुंबाला जगवण्यासाठी कोणत्या कोणत्या दिव्यातून जावे लागते हा याचा फक्त एक नमुना आहे. ही घटना ऐकून वाचून ज्याचे मन हेलावणार नाही तो मानव म्हणण्याच्या लायकीचाच नाही असे आम्हाला वाटते. आपल्या भागात असेही घडू शकते हे ऐकून कितीजण अशा प्रकारच्या धंद्यात गुंतलेत याचा शोध घेणे महत्त्वाचे आहे. आपली पोलीस यंत्रणा, आपले गुप्तहेर खाते, सरकारचे परराष्ट्र खाते आणि इतर अनेक संबंधित यंत्रणांनी या घटनेचा अत्यंत गंभीरपणे तपास केला पाहिजे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशा प्रकारचा एखादा मानवद्रोही समूह आपल्या आसपास कार्यरत आहे की काय याचाही शोध या सर्व यंत्रणांनी घेतला पाहिजे. ज्या डॉक्टरने कृत्य केले तो परदेशी असेलही, तसेच कंबोडियाचे कायदे काय आहेत हे आम्हालाही ठाऊक नाही. परंतु कोणी स्वेच्छेने किडनीदान करीत असेल तर तो भारततही गुन्हा ठरत नाही. पण ही तर सरळ सरळ फसवणूक आहे. कारण स्वतः किडनीदाता तक्रार करायला पुढे आलेला आहे. कर्जापोटी नाडलेला शेतकरी, कर्ज देणारा सावकार, ऑफर देणारा एजंट, त्यानंतर कम्बोडिया पर्यंतचा प्रवास आणि तिथे जाऊन किडनी काढून घेणे, आणि त्यासाठी ठरलेली रक्कम किडनी दात्याला न देणे. ही संपूर्णतः मानवतेला कलंक लावणारी घटना आहे. त्यामुळे यामधील सर्व साखळी गुन्हेगारांना पकडून त्यांना अद्दल घडवली पाहिजे, एवढीच आमची मागणी आहे.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्याने विकली किडनी!

■ **महासागर प्रतिनिधी चंद्रपूर, दि.१६ :**
जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील माणुसकीला काळिमा फासणारी धक्कादायक घटना पुढे आली आहे.कर्जाचा परतावा करण्यासाठी सावकारांनी शेतकऱ्याला किडनी विकायला लावली.
या क्रूर प्रकाराने जिल्हा हादरला आहे. जिल्हाच्या नागभीड तालुक्यातील मिंथुर गावात हा प्रकार घडला. रोशन सदाशिव कुडे असे शेतकऱ्याचे नाव आहे.
प्रसार माध्यमातून शेतकऱ्याची धक्कादायक आपबिती समोर आल्यानंतर जिल्हा प्रशासन जागे झाले आहे. पिडीत शेतकऱ्याला चौकशी साठी बोलावले आहे. यात दोषी सावकारांची चौकशी होणार आहे.
चंद्रपूर जिल्हातील या कर्जबाजारी शेतकऱ्याची वेदना आभाळाला भिडणारी आहे. सावकारी कर्जाचा जाळ्यात अडकलेल्या या शेतकऱ्याला कर्ज फेडण्यासाठी स्वतःची किडनी विकण्याचा वेदनादाई प्रसंग ओढवला. या शेतकऱ्याचे नाव आहे रोशन सदाशिव कुडे. ते चंद्रपूर जिल्हातील नागभीड तालुक्यातील मिंथुर गावातील रहिवाशी आहे. रोशन यांच्याकडे चार एकर शेती आहे. या शेतीवरच त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाह चालतो.
निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती फायदेशीर ठरली नाही. त्यामुळे शेतीपूरक व्यवसाय करण्याचे त्यांनी ठरविले. दुग्ध व्यवसायातून थोडी मिळकत होईल म्हणून त्यांनी दुधाळ गाई खरेदी केल्यात. यासाठी त्यांनी दोन सावकाराकडून ५०-५० हजार रुपये घेतले. येथेही त्यांना नशिबाने धोका दिला. खरेदी केलेल्या गाई मरण पावल्या. त्यात शेतीही पिकेना.
कर्जाचा डोंगर वाढत गेला. सावकार घरी येऊन नको ते बोलू लागलेत. कर्जातून मुक्त होण्यासाठी त्यांनी दोन एकर जागा विकली. ट्रॅक्टर आणि घरातील सामान विकले. मात्र कर्ज काही संपेना.
एक लाखाचे कर्ज ७४ लाखावर गेले. शेवटी कर्ज घेतलेल्या एका सावकाराने किडनी विकण्याचा सल्ला दिला. एका एजंटने रोशन कुडे यांना कलकत्ता येथे नेले. कुडे यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर कंबोडिया येथे त्यांच्यावर शस्त्रक्रिया झाली आणि किडनी काढण्यात आली. ही किडनी कुडे यांनी आठ लाखाला विकली.
एवढा भयानक प्रकार घडूनही पोलिस प्रशासन मात्र सुस्त आहे. रोशन कुडे यांनी सांगितले की, मी पोलिस अधीक्षकांकडे तक्रार केली, पण त्यांनी काहीच दखल घेतली नाही. पोलिसांनी वेळीच कारवाई केली असती, तर माझ्यावर किडनी विकण्याची वेळ आली नसती.

### सावकारांनी बाध्य केले : प्रशासन चौकशी करणार



#### मंत्रालयासमोर आत्मदहन?

जमीन गेली, ट्रॅक्टर गेला आणि आता शरीरातील किडनीही गेली, तरीही सावकाराचा तगादा थांबलेला नाही. आता माझ्याकडे गमावण्यासारखे काहीच उरले नाही. त्यामुळे सरकारने मला न्याय दिला नाही, तर मी कुटुंबासह मंत्रालयासमोर आत्मदहन करेन, असा इशारा रोशन कुडे यांनी दिला आहे.

दरम्यान, याप्रकरणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी पोलिसांना पत्र लिहून चौकशी करण्याची मागणी केली आहे. हे प्रकरण समजल्यावर त्या शेतकऱ्याला मदत केली असून, त्याला न्याय मिळावा म्हणून पोलिसांनी कारवाई करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

#### निर्दयी सरकारवर गुन्हा दाखल करा

सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी चंद्रपूरच्या शेतकऱ्याला स्वतःची किडनी विकावी लागत असेल, तर सरकारसाठी हे अत्यंत लाजीरवाणे आहे. या सावकारावर कठोर कारवाई झालीच पाहिजे. शिवाय सरकारने योग्य वेळेची वाट न पाहता तातडीने शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी, अन्यथा कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्याला आपले असे अवयव विकावे लागले तर, मानवी अवयवांच्या व्यापाराला पोषक वातावरण निर्माण केल्याप्रकरणी या निर्दयी सरकारवर गुन्हा का दाखल करु नये? असा सवाल रोहित पवारांनी केला आहे.

## धुक्यामुळे भीषण अपघात

# १३ जिवंत जळाले



८ बसेस आणि ३ कारची धडक

७० जखमी

■ **वृत्तसंस्था, मथुरा, दि. १६ :**
मथुरा येथील यमुना एक्सप्रेसवेवर सात बस आणि तीन कारची धडक झाली. अपघातानंतर वाहनांना आग लागली, त्यात १३ जणांचा मृत्यू झाला. बसमध्ये मानवी शरीराचे अवयव अडकलेले आढळले, त्यामुळे मृतांचा आकडा आणखी वाढू शकतो.
एका तरुणाने बसमधून आठ ते नऊ मृतदेह काढल्याचे वृत्त आहे. जळालेले अवशेष १७ प्लास्टिक पिशव्यांमध्ये भरून रुग्णालयात नेण्यात आले. डीएनए चाचणीद्वारे त्यांची ओळख पटेल. या अपघातात ७० जण जखमी झाले आहेत. तथापि, एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, २० रुग्णवाहिकांमधून १५० लोकांना रुग्णालयात नेण्यात आले.
बलदेव पोलिस स्टेशन परिसरातील माइलस्टोन १२७ येथे हा अपघात घडल्याचे डीएम चंद्र प्रकाश सिंह यांनी सांगितले. पोलिस, अग्निशमन दल आणि एसडीआरएफ पथकांनी सहा तासांत बचावकार्य पूर्ण केले. अपघातानंतर महामार्गावर बराच वेळ वाहतूक कोंडी झाली. ढिगारा साफ केल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरू झाली.
एक्सप्रेसवेवर दाट धुके असल्याने अचानक एका बसचा वेग कमी झाला, ज्यामुळे अनेक वाहने एकमेकांवर आदळली. प्रत्यक्षदर्शी भगवान दास यांनी सांगितले की, टक्कर झाल्यानंतर जणू काही बॉम्ब फुटल्यासारखे वाटले. लोक बसच्या खिडक्या तोडून बाहेर उड्या मारत होते. दरम्यान, मुख्यमंत्री योगी यांनी मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २ लाख रुपये देण्याचे जाहीर केले आहे.

## सुप्रिया सुळे, अमित शहांची भेट

### पुण्यात पवार काका-पुतण्या जवळ येणार?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१६ :**
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार असल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे.
सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली शरद पवार गटाचे शिष्टमंडळ अमित शहा यांची भेट घेणार आहे. या भेटीत राज्याशी संबंधित काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. विशेषतः शौर्य पाटील आत्महत्या प्रकरण, विमा कंपन्या आणि बँकांकडून होणारी कथित मनमानी यासंदर्भात केंद्र सरकारच्या भूमिकेवर चर्चा होणार असल्याचं सांगितलं जात आहे. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही भेट राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे.
राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका जाहीर झाल्याने राजकीय पक्षांच्या तयारीला वेग आला आहे. उमेदवारांची चाचपणी, युती-आघाडीच्या चर्चा आणि रणनिती ठरवण्याचे सत्र सुरू झाले आहे. दरम्यान, पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील राजकीय समीकरणांमध्येही हालचाली दिसून येत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये स्वबळावर निवडणूक लढवण्याचा नारा दिल्यानंतर काही तासांतच राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये संवाद सुरू झाल्याचं चित्र आहे.

## माणिकराव कोकाटेंना २ वर्षांची शिक्षा

■ **महासागर प्रतिनिधी नाशिक, दि.१६ :**

### मंत्रिपद जाणार?



नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने आज सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांना सदनिका घोटाळ्यात ठोठावलेली २ वर्षांची शिक्षा कायम ठेवली.
लोकप्रतिनिधित्व कायद्यानुसार २ वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षा झालेल्या मंत्र्यांचे मंत्रिपद जाते. त्यामुळे आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कोकाटेंचे मंत्रिपद काढून घेणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.
माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ सुनील कोकाटे यांना मुख्यमंत्री कोट्यातून मिळालेल्या सदनिकांबाबत बनावट कागदपत्रे सादर करून त्या लाटल्याप्रकरणी नाशिक जिल्हा न्यायालयाने प्रत्येकी दोन वर्षांचा कारावास व ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला होता. या निकालानंतर दोन तासांत त्यांना जामीन मंजूर झाल्याने कोकाटे यांचे मंत्रीपद तत्काळ धोक्यात आले नव्हते.
मात्र, आता या प्रकरणात महत्त्वाचा टप्पा समोर आला असून जिल्हा सत्र न्यायालयानेही त्यांच्यावर सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली आहे. त्यामुळे मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजकीय भवितव्यावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शिक्षेची पुष्टी झाल्यामुळे नैतिकतेच्या मुद्द्यावरून विरोधकांकडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी होण्याची शक्यता आहे. तसेच, या निर्णयामुळे राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली असून सरकारची पुढील भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बीएमसीसाठी शिंदेसेनेचा १२५ जागांचा आग्रह

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१६ :**
मुंबई महानगरपालिका निवडणुकीचे बिगुल वाजताच महायुतीमध्ये जागावाटपावरून रस्सीखेच सुरू झाली आहे.
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने मुंबईत १२४ जागा लढवण्याचा आग्रह धरला असतानाच, भाजपने त्यांना केवळ ५२ जागांचा प्रस्ताव दिल्याची विश्वसनीय माहिती समोर आली आहे. भाजपने थेट ५२ जागांची यादीच शिंदेसेनेकडे सोपवल्याने जागावाटपाच्या चर्चेत सुरुवातीलाच तणाव निर्माण झाल्याचे चित्र आहे.
२०१७ मध्ये एकसंध शिवसेनेने ८४ जागा जिंकल्या होत्या, पुढे ही संख्या ९९ वर पोहोचली.



पक्षात फूट पडल्यानंतर यातील ४७ नगरसेवकांनी शिंदे गटाची वाट धरली. आपल्याकडे १०० हून अधिक माजी नगरसेवकांची फौज असल्याचा दावा शिंदे गट करत आहे. याच बळावर त्यांनी १२५ जागांवर दावा केला आहे.

## ठाकरे बंधूंच्या युतीची १-२ दिवसांत बातमी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१६ :**
मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर राज व उद्धव ठाकरे यांच्या पक्षांच्या युतीची पुढील १-२ दिवसांत बातमी देऊ, असा दावा मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी केला आहे.
शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनीही राज ठाकरेंच्या भेटीनंतर याविषयी सकारात्मक विधान केले आहे. युतीची घोषणा केव्हा करायची याचा निर्णय दोन्ही पक्षांचे नेते मिळून ठरवतील, असे ते म्हणालेत.
खासदार संजय राऊत व आमदार अनिल परब यांनी आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेऊन त्यांच्याशी युती करण्याच्या मुद्यावर चर्चा केली. त्यानंतर अनिल परब यांनी युतीची घोषणा कधी करायची याचा निर्णय दोन्ही पक्षांचे नेते मिळून ठरवणार असल्याचे स्पष्ट केले.

## उद्योगमंत्री उदय सामंत रुग्णालयात दाखल

■ **मुंबई, दि.१६ :**
राज्याचे उद्योगमंत्री आणि रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना मुंबईतील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. शनिवारी रात्रीपासून त्यांच्यावर उपचार सुरू असून, सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.

## ग्रीन सर्वात महागडा परदेशी खेळाडू

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि.१६ :**
ऑस्ट्रेलियन अष्टपैलू खेळाडू कॅमरुन ग्रीन आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा परदेशी खेळाडू ठरला आहे. मंगळवारी अबू धाबी येथे झालेल्या मिनी-लिलावात त्याला कोलकाता नाईट रायडर्सने २५.२० कोटी (२५२ दशलक्ष रुपये) मध्ये खरेदी केले.



KKR ने कॅमरुन ग्रीनला ₹25.20 Cr मध्ये खरेदी केले
बेस प्राइस : 2 कोटी

ग्रीनने त्याच्या देशाच्या मिचेल स्टार्कचा विक्रम मोडला, ज्याला यापूर्वी केकेआरने २०२४ मध्ये २४.७५ कोटी (२४७ दशलक्ष रुपये) मध्ये खरेदी केले होते.
ऑस्ट्रेलियन जेक फ्रेझर-मॅकगर्क, डेव्हॉन कॉनवे आणि पृथ्वी शॉ हे खेळाडू अनसोल्ड राहिले. त्यांच्यावर कोणतीही बोली लावण्यात आली नाही.
दरम्यान, दक्षिण आफ्रिकेच्या डेव्हिड मिलरला दिल्ली कॅपिटल्सने २ कोटी (२० दशलक्ष) मध्ये खरेदी केले.
व्यंकटेश अय्यरला आरसीबीने ७ कोटी (७० दशलक्ष रुपये) मध्ये खरेदी केले. तो पूर्वी केकेआरमध्ये होता, ज्याने त्याला २३.७५ कोटी (२३.७५ दशलक्ष रुपये) मध्ये खरेदी केले होते.
ऋषभ पंत हा लिलावाच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू आहे. गेल्या वर्षीच्या मेगा लिलावात त्याला लखनौ सुपर जायंट्सने २७ कोटींना खरेदी केले होते. दहा संघ ७७ खेळाडूंसाठी बोली लावत आहेत. लिलावात ३५० खेळाडू लिलावात सहभागी होतील.











# महापालिका प्रशासन लागले तयारीला

## महानगरपालिका निवडणुकीच्या तयारीचा सखोल आढावा



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 16 ) –** अमरावती महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक 15 जानेवारी 2026 रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत होणार असून 16 जानेवारी 2026 रोजी मतमोजणी होणार आहे. एकूण 87 जागांसाठी ही निवडणूक पार पडणार आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच महापालिका क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया, नियोजन व अंमलबजावणीचा सखोल आढावा घेण्यासाठी आयुक्त सौम्या शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका कॉन्फरन्स हॉलमध्ये महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

महानगरपालिका निवडणुकीसाठी ऑफलाईन पद्धतीने नामनिर्देशनपत्रे दाखल करता येणार आहेत. महानगरपालिका क्षेत्रात एकूण 6 लाख 77 हजार 180 मतदार असून त्यानुसार मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणुकीसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) मागणी करण्यात आली आहे.

निवडणूक प्रक्रियेसाठी 8 निवडणूक निर्णय अधिकारी व 7 सहाय्यक निवडणूक अधिकारी क्र. 1 यांची नियुक्ती करण्यात आली असून प्रभागनिहाय सहाय्यक निवडणूक अधिकारी क्र. 1, 2 व 3 नेमण्यात आले आहेत. आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू आहे. महानगरपालिकेत आचारसंहिता कक्ष स्थापन करण्यात आला असून झोननिहाय दक्षता समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती देखील तयार करण्यात आली आहे.

### निवडणूक कार्यक्रम

| | |
|---|---|
| नामनिर्देशनपत्र स्वीकारणे | : 23 ते 30 डिसेंबर 2025 |
| नामनिर्देशनपत्रांची छाननी | : 31 डिसेंबर 2025 |
| उमेदवारी माघारीची अंतिम मुदत | : 2 जानेवारी 2026 |
| निवडणूक चिन्ह वाटप व अंतिम यादी | : 3 जानेवारी 2026 |
| मतदान | : 15 जानेवारी 2026 |
| मतमोजणी | : 16 जानेवारी 2026 |

### मताधिकार मोबाईल ॲप

मतदारांना मतदार यादीतील नाव, मतदान केंद्र व उमेदवारांविषयी माहिती मिळावी यासाठी राज्य निवडणूक आयोगाने 'मताधिकार' हे मोबाईल ॲप उपलब्ध करून दिले आहे. हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध असून मतदार आपले संपूर्ण नाव किंवा ईपीआयसी क्रमांक टाकून माहिती मिळवू शकतात. संकेतस्थळावरूनही मतदार यादीतील नाव शोधण्याची सुविधा उपलब्ध आहे.

### मतमोजणी नवसारी स्पोर्ट कॉम्प्लेक्स येथे



महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतमोजणी प्रक्रिया पारदर्शक, सुरक्षित व नियोजनबद्ध व्हावी यासाठी आयुक्त सौम्या शर्मा यांनी 16 डिसेंबर 2025 रोजी नवसारी स्पोर्ट कॉम्प्लेक्स येथील मतमोजणी केंद्राची पाहणी केली. मतमोजणी कक्षांची रचना, टेबलांची मांडणी, उमेदवार व प्रतिनिधींसाठी बसण्याची व्यवस्था, माध्यम प्रतिनिधींसाठी स्वतंत्र कक्ष तसेच मतमोजणी कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सुविधा यांचा त्यांनी आढावा घेतला. मतमोजणी केंद्रातील सीसीटीव्ही कॅमेरे, प्रवेश व निर्गमन मार्ग, पोलीस बंदोबस्त, ओळखपत्र तपासणी व्यवस्था, अखंड वीजपुरवठा, जनरेटर, अग्निशमन यंत्रणा व वैद्यकीय सुविधांची तपासणी करण्यात आली. स्ट्रॉंगरूम, ऑब्झर्व्हर रूम, पार्किंग व्यवस्था, पोलीस नियंत्रण कक्ष तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बैठक व्यवस्थेचे योग्य नियोजन करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. मतमोजणी प्रक्रिया शांततेत, पारदर्शकतेने व नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज असल्याचा विश्वास आयुक्तांनी व्यक्त केला. या पाहणीवेळी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, निवडणूक विभागाचे अधिकारी, महानगरपालिकेचे विभागप्रमुख व संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

# भरधाव कार झाडावर आदळली

## कारमधील दोघांचा मृत्यू | लोणी-टाकळी रस्त्यावर भीषण अपघात



महासागर प्रतिनिधी

**अमरावती,( दि.16 ) –** नांदगाव खंडेश्वरहून बडनेऱ्याकडे जाणाऱ्या कारचा लोणीङ्कटाकळी रस्त्यावर भीषण अपघात झाला. मागून आलेल्या अज्ञात वाहनाच्या धडकेत कार झाडावर आदळली असून, या अपघातात दोघा तरुणांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना सोमवारी मध्यरात्री घडली. मृतांमध्ये मोहम्मद अफान मोहम्मद इद्रिस भूत (वय 19) आणि मोहम्मद ओसामा मोहम्मद मुबस्सीर (वय 25, दोघेही रा. नांदगाव खंडेश्वर) यांचा समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी रात्री 12.30 ते 1.00 च्या दरम्यान हे दोघे एमएच 04/एफआर 5567 क्रमांकाच्या कारने नांदगाव खंडेश्वरहून बडनेरा येथे घरगुती कामासाठी निघाले होते. लोणीङ्कटाकळी रस्त्यावर मागून येणाऱ्या एका महिलेच्या वाहनाने त्यांच्या कारला धडक दिली. त्यामुळे कारवरील नियंत्रण सुटले आणि ती थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर आदळली. अपघात इतका भीषण होता की चालक मोहम्मद अफान इद्रिस भूत आणि शेजारच्या सीटवर बसलेले मोहम्मद ओसामा मुबस्सीर यांचा जागीच मृत्यू झाला. दोघांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना तत्काळ शहरातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच नातेवाइकांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली होती. दरम्यान, लोणी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून पुढील तपास सुरू करण्यात आला असून, अपघाताचे नेमके कारण अद्याप तपासाधीन आहे.

### शासकीय कामात अडथळा करून मारहाण केल्याप्रकरणी दोघांना शिक्षा

**अमरावती –** शासकीय कामात अडथळा निर्माण करून बस चालकास शिवीगाळ व मारहाण केल्याप्रकरणी जिल्हा न्यायालय (क्र. 01) व अतिरिक्त सत्र न्यायालय, वरूड यांनी दोन्ही आरोपींना दोषी ठरवत कारावास व दंडाची शिक्षा सुनावली आहे. नंदू शंकरराव वानखडे (वय 35) व गोकुल विठ्ठलराव मेघरासे (वय 35, दोन्ही रा. राजुरवाडी, रिध्दपूर, ब्राम्हणवाडा रोड) असे शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत. हा निकाल 15 डिसेंबर 2025 रोजी सुनावण्यात आला. पोलिस सुत्रानुसार, 31 मार्च 2025 रोजी फिर्यादी एसटीचे बस चालक शहजाद खॉं मुस्तफा खॉं (वय 40, रा. रिद्धपुर, ता. मोर्शी, जि. अमरावती) हे चांदुरबाजारवरून तिवसा बस घेऊन जात होते. दरम्यान रिध्दपूर ते ब्राम्हणवाडा गावादरम्यान आरोपींनी दुचाकी आडवी करून बस थांबविली आणि चालकाला ओढताण करीत शिविगाळ करून मारहाण केली.

# शिकवणी वर्गाला जाताना शाळकरी मुलीचा अचानक मृत्यू

## मोर्शीत हळहळ



महासागर प्रतिनिधी

**मोर्शी( दि.16 ) –** मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या मागील परिसरात राहणाऱ्या श्रुतिका मंगेश बुगल (वय 16) या दहावीतील विद्यार्थिनीचा मंगळवारी सकाळी अचानक मृत्यू झाल्याची घटना घडली. या दुर्दैवी घटनेमुळे शहरात शोककळा पसरली आहे.

श्रुतिका ही शिवाजी विद्यालयाची दहावीची विद्यार्थिनी होती. नेहमीप्रमाणे मंगळवारी सकाळी सुमारे सात वाजता ती आपल्या दोन मैत्रिणींसह सायकलने शिकवणी वर्गाकडे जात होती. दुरभाष केंद्रासमोर पोहोचताच तिला अचानक चक्कर आल्याने ती सायकलवरून खाली कोसळली. ही घटना पाहताच तिच्या मैत्रिणींनी घाबरून आजूबाजूच्या नागरिकांना मदतीसाठी हाक मारली.

नागरिकांनी तात्काळ तिला जवळच असलेल्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच परिसरात राहणारे तिचे नातेवाईक व आप्तेष्टांनी रुग्णालयात धाव घेतली. श्रुतिकाच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. एका तरुण, हुशार विद्यार्थिनीचा अशा अचानक मृत्यू झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र हळहळ व्यक्त होत असून, सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे.

# शहरात एमडी विक्रीचा डाव उधळला; दोघे जेरबंद

## गुन्हे शाखेची मोठी कामगिरी – 52 ग्रॅम एमडी जप्त, 6.10 लाखांचा मुद्देमाल हस्तगत

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, दि. 16 –** शहरातील तरुणाईला नशेच्या गर्तेत ढकलणाऱ्या एमडी (मेफेड्रोन) विक्रीच्या साखळीवर अमरावती गुन्हे शाखेने जोरदार कारवाई केली आहे. सोमवारी उशिरा रात्री दोघांना रंगेहाथ पकडत 52 ग्रॅम एमडी जप्त केली, ज्याची अंदाजे किंमत 6 लाख 10 हजार रुपये आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी शेख जमीर उर्फ बाबा शेख आमद (वय 39, रा. गवलीपुरा, रतनगंज मशीद परिसर, अमरावती) याचा समावेश असून त्याच्यासोबत एक अल्पवयीन आरोपीही आहे. पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी शहरात अमली पदार्थांच्या विक्री, तस्करी व सेवनाविरोधात शून्य सहनशीलतेचे धोरण राबवण्याचे आदेश दिले असून, त्यानुसार गुन्हे शाखेने कारवाईचा वेग वाढवला आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने 15 डिसेंबर रोजी आयुक्तालय क्षेत्रात गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली की, शेख जमीर व त्याचा साथीदार दुचाकीवरून लालखडी रिंग रोडकडे एमडी विक्रीसाठी येत आहेत.

माहितीची खात्री होताच, पथकाने सापळा रचून दोघांनाही ताब्यात घेतले. झडतीदरम्यान आरोपींकडून 52 ग्रॅम एमडी पावडर, एक मोबाईल फोन व एक अ?क्टिव्हा दुचाकी जप्त करण्यात आली. चौकशीत आरोपींनी ही एमडी शेख राजा शेख रहीम उर्फ होंगा, शेख सोनू शेख रहीम उर्फ होंगा, शेख फईम शेख रहीम उर्फ होंगा तसेच शेख रहीम उर्फ होंगा शेख आमद यांच्या मालकीची असल्याचे सांगितले. हे नेटवर्क शहरात सक्रिय असून, सध्या हे चारही आरोपी फरार आहेत.

### खिशातील मोबाईल-रोख लंपास; दोघांविरुद्ध गुन्हा

**अमरावती –** वरुड तालुक्यातील पवन सक्राजी येथील रहिवासी अनिल बाबुराव धोटे (48) मंगळवारी खरेदीसाठी वरुड येथे गेले होते. मुंगासजी बारमध्ये मद्यपान करून बाहेर पडत असताना आरोपी देवेंद्र उर्फ देवा ज्ञानेश्वर पोहरकर व गोलू नागले यांनी त्यांच्या खिशातून मोबाईल फोन व रोख रक्कम चोरली. या चोरीत मोबाईलसह 17 हजार रुपये रोख असा एकूण 32 हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास झाला. अनिल धोटे यांच्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# पवन वानखडे हत्याकांडातील आरोपी भुसावळतून अटक

## अवघ्या 12 तासांत गुन्हे शाखेने लावला छडा




**अमरावती, ( दि. 16 ) –** खोलापुरीगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भाजीबाजार चौकात सोमवारी उशीरा रात्री घडलेल्या पवन वानखडे यांच्या खून प्रकरणाचा गुन्हे शाखेने अवघ्या 12 तासांत छडा लावला आहे. जुन्या वादातून झालेल्या या निर्घृण हत्येप्रकरणी तीन आरोपींना जळगाव जिल्ह्यातील भुसावळ येथून अटक करण्यात आली असून, एकाला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

सोमवारी रात्री सुमारे आठ वाजताच्या सुमारास भाजीबाजार चौकात पवन वानखडे यांच्यावर तीन ते चार जणांनी चाकूने हल्ला करून त्यांची हत्या केली. घटनेनंतर हल्लेखोरांनी घटनास्थळावरून पलायन केले. या प्रकारामुळे परिसरात तणाव निर्माण झाला असून, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

या प्रकरणी मृत पवन वानखडे यांचा मुलगा विनित वानखडे याने दिलेल्या फिर्यादीवरून खोलापुरीगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. जुन्या वादातून आरोपींनी पवन वानखडे यांना भाजीबाजारात बोलावून घेतले आणि झालेल्या वादातून चाकूने वार करून त्यांची हत्या केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहिती व खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी आरोपींचा माग काढत त्यांना भुसावळ येथून ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये वैभव उर्फ समीर उर्फ चिकन्या गणेश पत्रे (वय 24, रा. खरकडीपुरा, अमरावती), साहिल आत्माराम हिरपूरकर (वय 19, रा. महाजनपुरा, अमरावती) आणि सूरज प्रमोद पिडेकर (वय 25, रा. महाजनपुरा, अमरावती) यांचा समावेश आहे. तसेच सौरभ कैलासराव विजयकर (वय 23, रा. महाजनपुरा) याला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे. अटक करण्यात आलेल्या सर्व आरोपींना पुढील तपास व कायदेशीर कारवाईसाठी खोलापुरीगेट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे व रमेश धुमाळ तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिकेत कासार (सायबर), प्रियंका कोटावार, गजानन सोनुने, दीपक सुंदर, राजकुमार शेख, रायलीवाले, निखिल गेडाम, चेतन कराडे आणि प्रभात पोकळे यांच्या पथकाने ही उल्लेखनीय कामगिरी बजावली.

# ऑर्डिनेट सोल्युशन प्रा. लि.च्या कार्यालयाचे उद्या ग्रँड ओपनिंग

## अमरावती शहरात पहिली कॉर्पोरेट कंपनी नावारूपाला



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 16 ) – अमरावती शहरात पहिल्यांदाच एका कॉर्पोरेट कंपनीचे भव्य स्वरूपात पदार्पण होत आहे. ऑर्डिनेट सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या नव्या कॉर्पोरेट कार्यालयाचे उद्घाटन गुरुवारी ( दि. 18 ) होत असून, अवघ्या 27 वर्षांचे अश्लेष अजय जगताप व ऋषिकेश कार यांनी या कंपनीची स्थापना केली आहे. या कंपनीच्या माध्यमातून अभियांत्रिकी व तत्सम क्षेत्रातील 50 हून अधिक तरुणांना स्वगृही रोजगार उपलब्ध झाला आहे.**




### कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ऑर्डिनेटचे कार्य

अश्लेष जगताप यांनी सांगितले की, ऑर्डिनेट सोल्युशन प्रा. लि. ही कंपनी सेवा, निर्मिती आणि व्यवस्थापन या तीन प्रमुख क्षेत्रांत कार्यरत आहे. सेवा क्षेत्रात कंपनी घनकचरा व्यवस्थापनाचे अत्याधुनिक उपाय उपलब्ध करून देते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विमानतळांसह विविध मोठ्या प्रकल्पांमध्ये कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी ऑर्डिनेटकडे सोपवली जाते. कचरा पेटीपासून कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांपर्यंतची संपूर्ण प्रणाली सेन्सर व सॉफ्टवेअरच्या माध्यमातून एकत्रित केली जाते. त्यातून मिळणाऱ्या डेटाचे कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे विश्लेषण करून अचूक, नियोजनबद्ध व शिस्तबद्ध व्यवस्थापन उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे संबंधित कंपन्यांचे नुकसान थांबून नफ्यात वाढ होते.

### निर्मिती व व्यवस्थापन क्षेत्रातही प्रभावी उपाय

निर्मिती क्षेत्रात क्वालिटी कंट्रोलपासून प्रकल्पातील दिरंगाई रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना ऑर्डिनेटकडून सुचवण्यात येतात. प्राप्त डेटाच्या विश्लेषणाच्या आधारे कोणत्या टप्प्यावर अडथळे येत आहेत, हे स्पष्ट केले जाते. हेल्पडेस्क व्यवस्थापनद्वारे प्रत्येक स्तरावर तक्रार नोंदणी, त्यावर परिणामकारक कारवाई, घटनांची नोंद व सातत्यपूर्ण देखरेख केली जाते. त्यामुळे संभाव्य मोठे नुकसान टाळता येते.

### इन्व्हेंटरी व्यवस्थापन व वाढता विश्वास

इन्व्हेंटरी व्यवस्थापनाअंतर्गत साहित्याचे वर्गीकरण, उपलब्ध साठा, नुकसान झालेला साठा व वापर यांची अचूक नोंद व नियंत्रण ठेवले जाते. आतापर्यंत 100 हून अधिक कंपन्या ऑर्डिनेट सोल्युशन प्रा. लि.शी जोडले गेले असून, अमरावतीतील क्रेडाई, गोविंदा ग्रुप, ईसीई यांसह अनेक नामांकित संस्थांना सेवा दिली जात असल्याची माहिती अश्लेष जगताप यांनी दिली.

अमरावतीसारख्या शहरात कॉर्पोरेट व मल्टिनॅशनल कंपन्यांचा अभाव असल्याने येथील उच्चशिक्षित तरुणांना पुणे, मुंबई, नागपूर, बेंगळुरू यांसारख्या मेट्रो शहरांकडे स्थलांतर करावे लागते. स्वत:चा उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या तरुणांनाही मोठ्या शहरांचीच वाट धरावी लागते. मात्र, आपल्याच जन्मभूमीत रोजगारनिर्मितीचा आदर्श घालून देणारे अश्लेष जगताप हे आज अनेक तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.

दैनिक महासागर शी बोलताना अश्लेष जगताप यांनी सांगितले की, तीन वर्षांपूर्वी घरातून सुरू केलेल्या या कंपनीचा विस्तार सातत्याने वाढत गेला आणि आता ती एका सुसज्ज कॉर्पोरेट कार्यालयात दाखल होत आहे. रुक्मिणी नगर येथील मुख्य मार्गावरील जे.के.पी. टॉवरच्या चौथ्या मजल्यावर ऑर्डिनेट सोल्युशन प्रा. लि.च्या मुख्यालयाचे उद्घाटन होणार आहे.

# रोही आडवा आल्याने भीषण अपघात

## ऑटोचालकाचा जागीच मृत्यू

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, ( दि.16 ) –** भरधाव ऑटोरिक्षाच्या समोर अचानक रोही आडवा आल्याने झालेल्या अपघातात ऑटोचालकाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना चिखलसावंगी मार्गावरील पुलाजवळ घडली.

सतीश एकनाथ भुसारी (वय 57) हे आपली ऑटोरिक्षा घेऊन मोर्शीवरून चिखलसावंगीच्या दिशेने जात होते. चिखलसावंगी रोडवरील पुलाजवळ अचानक रोही समोर आल्याने ऑटोरिक्षा अनियंत्रित झाली आणि पलटी झाली. या अपघातात सतीश भुसारी हे ऑटोखाली दबले गेले, ज्यामुळे त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना रविवारी रात्री घडली.

अपघाताची माहिती मिळताच गावाशेजारील झोपडपट्टीतील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी ऑटो बाजूला करून भुसारी यांना बाहेर काढले; मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झालेला होता. घटनेची माहिती पोलिस पाटलांनी मोर्शी पोलिसांना दिल्यानंतर पोलिस पथक घटनास्थळी पोहोचले व पंचनामा केला.

मृतकाचा मृतदेह उशिरा रात्री मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या शवविच्छेदन गृहात पाठविण्यात आला. सोमवारी, 15 डिसेंबर रोजी दुपारी शोकाकूल वातावरणात चिखलसावंगी येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहेत.

### किरकोळ वादातून विळ्याने वार

**अमरावती –** मोर्शी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मंगळवारी किरकोळ वादातून विळ्याने वार करून हत्येचा प्रयत्न झाल्याची घटना घडली. या घटनेत रमेश चिरकुटराव शेंद्रे (55) हे गंभीर जखमी झाले आहेत.


**सूचना**

कंपनीच्या पॉलिसीधारकांना सूचना देण्यात येते की आमचे कार्यालय पहिल्या मजल्यावर, दुकान क्रमांक-10, शेवाळकर एन्क्लेव्ह, राजपेठ, अमरावती 444605 हे 23 फेब्रुवारी 2026 पासून दुकान क्रमांक 13, बिझीलँड हाइट्स, तिसरा मजला, जवाहर रोड, चित्रा चौक, अमरावती-444601 येथे हलवले जाईल. कोणत्याही मदतीसाठी आम्हाला care@libertyinsurance.in वर लिहा किंवा आमच्या टोल-फ्री क्रमांक 1800 266 5844 वर कॉल करा (सकाळी 8:00 ते रात्री 8:00 दरम्यान, आठवड्याचे 7 दिवस).

सर्वांनी वरील माहितीची नोंद घ्यावी अशी विनंती आहे.

अधिकृत स्वाक्षरीकर्ता


स्वा/-

लिबर्टी जनरल इन्शुरन्स लिमिटेड

युनिट 1501 आणि 1502, 15 वा मजला, टॉवर 2, वन इंटरनॅशनल सेंटर, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी, मुंबई - 400013

CIN U66000MH2010PLC209656 • IRDAI नोंदणी क्रमांक 150

एका ऑनलाईन परीक्षेत उच्च जातीचे नाव कोणते? ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्र व वैश्य असे चार पर्याय देण्यात आले होते. असा प्रश्न विचारल्यानंतर विद्यार्थ्यांनी एकमेकांच्या तोंडाकडे पाहायला सुरुवात केली. ही परीक्षा यवतमाळ येथे झाली. एका बाजूला विद्यार्थ्यांना समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाज निर्मितीचे धडे दिले जात असताना, अशा प्रकारे प्रश्न विचारून परीक्षा घेणाऱ्या यंत्रणेला नेमके काय सिद्ध करायचे आहे, हा प्रश्न पालकांना व शिक्षकांना बुचकळ्यात पाडणारा ठरला. या प्रश्नामुळे केवळ शिक्षकच नव्हे, तर विद्यार्थीही अचंबित झाले. जगाला समता, बंधुता आणि न्यायाचा संदेश देणाऱ्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६ डिसेंबर या महापरिनिर्वाण दिनीच ही घटना घडली. भारत प्राचीन काळापासून जातीव्यवस्थेच्या तावडीत सापडला आहे. जातीव्यवस्था ही एक सामाजिक कीड आहे, जी भारतीय समाजात प्राचीन काळापासून चालत आली आहे. वर्षानुवर्षे लोक त्यावर टीका करत आहेत. पण तरीही जातीव्यवस्थेने आपल्या देशातील सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेवर आपली पकड कायम ठेवली आहे. जाती प्रणालीमध्ये वर्ण प्रणाली सुरू झाल्यानंतर जातीप्रती भेदभाव सुरू झाला. उच्चजाती लोकांना महान मानले गेले आणि आदराने वागवले गेले. त्यांना अनेक विशेषाधिकार देखील मिळाले. याउलट, कमी वर्गाचे लोक उपासनेच्या आधारावर अपमानित होत गेले. आजकाल प्रत्येक राजकीय पक्षाचा एक ठरलेला धार्मिक अजेंडा आहे. धर्माचे महत्व मंदिरापेक्षा आणि जातीचे महत्व दाखल्यापेक्षा राजकारणात सर्वात जास्त दिसत असल्यामुळे, भारत 'सर्वधर्म सामावून घेणारा धर्मनिरपेक्ष राष्ट्र' खरच आहे का? असा प्रश्न सामान्य माणसाला सहज पडतो. घटनाही अशाच घडतात. एका बाजूला वेगळा विदर्भ करण्याच्या संदर्भात राजकीय नेते चर्चा करीत असताना, त्याच विदर्भात एका चाचणी परीक्षेत उच्च जात कोणती? असा प्रश्न विचारल्यामुळे 'आता एवढेच बाकी राहिलं होतं' असं म्हणायची वेळ आली. जात ही भारतीय समाजाची एक जुनी आणि गुंतागुंतीची सामाजिक व्यवस्था आहे. जन्माने मिळणारा हा सामाजिक स्तर अनेक वर्षांपासून भारतीय लोकांच्या जीवनाचा भाग राहिला आहे. जात ही अशी स्तरीकरणाची व्यवस्था आहे, ज्याच्या सदस्यत्वासाठी त्या स्तरित गटातच जन्म घेणे आवश्यक आहे. म्हणजेच जात ही त्या विशिष्ट जातींतच जन्माला आल्याने मिळते. जात म्हणजे जन्मावर आधारित सामाजिक स्तर असून ती वंश आणि व्यवसायाशी जोडलेली आहे. पण आता ती सामाजिक बदलामुळे बदलते आहे, असे वाटत होते. पण अजूनही समाज सुधारायला तयार नाही, हे यवतमाळ मधील पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना विचारलेल्या प्रश्नावरून सिद्ध झाले आहे!








# एवढचं बाकी राहीलं होतं!



थर्ड अम्पायर

जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

यवतमाळ जिल्ह्यात इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता आणि निकालाची टक्केवारी वाढावी, यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागान पुढाकार घेत 'टार्गेट पीक अप्स' संस्थेमार्फत विद्यार्थ्यांकडून सराव मोहीम राबिविली होती. यात जवळपास चोवीस हजार विद्यार्थी सराव करीत होते. विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा सोडू शकतील अशी ही व्यवस्था होती.

या 'टार्गेट पीक अप्स'च्या आठवीच्या दुसऱ्या ऑनलाइन सराव चाचणीच्या प्रश्न पत्रिकेत विचारण्यात आलेला एक प्रश्न चांगल्याच वादाचे कारण बनण्याची शक्यता आहे. या ऑनलाइन प्रश्न पत्रिकेत इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या प्रश्नावलीत 'उच्च जातीचे नाव काय?' असा प्रश्न विचारण्यात आला असून पर्याय समाजातील वर्णव्यवस्था दाखवणारे असल्याने शिक्षकांसह शैक्षणिक वर्तुळातून मोठा संताप उमटला आहे.

विद्यार्थ्यांच्या मनातून जाती निर्मूलन कसे करणार, असा प्रश्नही उपस्थित करण्यात येत आहे. यामुळे या संस्थेवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. परीक्षा २२ फेब्रुवारीला होणार आहे. या प्रश्नासंदर्भात संबंधित संस्थेकडून प्रश्नाची ठेवण आणि भाषा चुकीची होती. त्यामुळे त्यांच्याकडून लेखी खुलासा मागवण्यात आला आहे.

त्यांनतर कारवाई करण्यात येणार असल्याचे कळते. सर्वात आधी जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित केले पाहिजे. कारण आपण हिंदुस्थानात राहतो. आपल्या घटनेत सर्वांना समान लेखलेले आहे. आपण जातपात मांडायलाच नको. जात मानत असाल तरी कोणती जात उच्च आणि कोणती जात कनिष्ठ हे बिलकुल होऊ शकत नाही. त्यामुळे असा प्रश्न विचारणे आणि विद्यार्थ्यांच्या मनात असा प्रश्न रुजवणे हे समाजाच्या दृष्टीने अतिशय चुकीचे आहे.

कोणती जात उच्च हा काही प्रश्न होऊ शकतो का? सगळ्या जाती सारख्याच आहेत. विद्यार्थ्यांच्या मनात जात बिंबवणे हा गुन्हा आहे. जातिवादाचे दुष्परिणाम समाजावर आणि व्यक्तींवर खोलवर परिणाम करतात. एकमेकांबद्दल गैरसमज निर्माण होऊन समाज एकत्र येण्याऐवजी विभागला जातो. भेदभावामुळे शिक्षण, नोकरी, निवारा, आरोग्य सेवा यांसारख्या मूलभूत क्षेत्रांत काही लोकांना कमी संधी मिळते.

यामुळे पूर्ण समाजाची प्रगती मंदावते. समाजातील काही घटक मागे पडल्यामुळे एकूण आर्थिक प्रगतीवर विपरीत परिणाम होतो. विविधतेतून मिळणारी नवनिर्मिती आणि कौशल्याचा फायदा मिळत नाही. जातिवाद माणसाला माणूस म्हणून पाहण्याची दृष्टीच कमी करतो. प्राचीन भारतात वर्णव्यवस्थेनुसार ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र लोकांची विभागणी झाली होती, ज्यात व्यवसाय आणि सामाजिक दर्जा ठरलेला होता. कालांतराने, या वर्णांमधून अनेक जाती तयार झाल्या, ज्यांचे सदस्यत्व जन्मानेच मिळत असे.

जात ही जन्मावर आधारित एक सामाजिक रचना आहे, जी विवाह, व्यवसाय आणि संस्कृतीशी जोडलेली असते. तुमचा वंश, कुळ आणि आडनाव यातून तुमची जात ठरते, असे काहीजण मानतात. या व्यवस्थेमुळेच समाजात विषमता आणि भेदभाव निर्माण झाला. लोकशाही, शिक्षण आणि जमीन सुधारणांमुळे जातीवर आधारित सत्तेचे पारंपरिक स्वरूप बदलत आहे. पण जातीचा वापर अनेकदा राजकीय फायद्यासाठीच केला जातो, ज्यामुळे जातीवाद पुन्हा उफाळून येतो.

जातीमुळे समाजाचे भले झाले की वाईट, हा वादग्रस्त विषय आहे. शिक्षण, आधुनिक विचार आणि कायद्याच्या मदतीने जातीवर आधारित विषमतेवर मात करणे शक्य आहे. प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळायला हवी, जातीच्या आधारावर नाही, हाच खरा विचार आहे. आजच्या युगामध्ये जिकडेतिकडे राजकीय आणि धार्मिक वारे वाहू लागतात. व्यक्तीला कळतच नाही की नेमके योग्य कोण ? पण खरे पाहता सर्व धमार्ची एक शिकवण आहे ती म्हणजे मानवता हाच खरा धर्म आहे.

यवतमाळ जिल्हा परिषदेअंतर्गत घेतलेल्या परीक्षेत वर्णभेदावर अत्यंत वादग्रस्त आणि बालमनावर विपरीत परिणाम करणारा प्रश्न समाविष्ट झाल्याने शिक्षण वर्तुळातच नव्हे तर समाजातील सर्व घटकात तीव्र संताप व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांना नेमकी समता शिकवायची की पुन्हा एकदा जुनाट वर्णव्यवस्था त्यांच्या डोक्यात भिनवायची, असा मूलभूत प्रश्न उपस्थित झाला आहे.

जर या उपक्रमात अशा पद्धतीने वर्णभेद आणि जातीय भेदभावाला खतपाणी घालणारे प्रश्न समाविष्ट होत असतील, तर आपल्या उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. आजच्या आधुनिक आणि पुरोगामी शिक्षण प्रणालीत शाळांमध्ये विद्यार्थ्यांना संविधानातील मूल्यांनुसार ह्यआम्ही भारताचे लोकद्ब्ल या उद्देशिकेतील सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही गणराज्याचे महत्त्व शिकवले जाते. अभ्यासक्रमात कुठेही वर्णभेद किंवा जातीभेद शिकवला जात नसताना, इतक्या लहान वयात मुलांना ह्यउच्चद्ब आणि ह्यकनिष्ठद्ब या भावनांची जाणीव करून देण्याचा हा प्रयत्न अत्यंत अक्षम्य मानला जात आहे. अभ्यासक्रमाबाहेरील, संवेदनशील आणि सामाजिक सलोख्याला बाधा आणणारा हा प्रश्न बालमनावर विषमता आणि उच्च-नीचतेचा ठसा उमटवणारा आहे.

प्रश्नपत्रिका तयार करताना प्रत्येक प्रश्नाकडे अत्यंत गांभीर्याने आणि जाणीवपूर्वक लक्ष देणे गरजेचे होते. जेथे हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य आणि दृष्टिकोन घडवला जातो, तेथे अशा गंभीर चुका अक्षम्य आहेत. हा प्रश्न बालकांच्या संवेदनशील मनावर विपरीत परिणाम करणारा गंभीर विषय आहे.खरे तर जातीयवाद नावाचा कोणताही वाद वगैरे नाही आहे. जे काही आहे ते स्वार्थी लोकांनी समाजात फूट पाडण्याची कारस्थाने केली आहेत.

तसे पाहिले तर विवीध जाती पातीचे धर्म इत्यादी लोक वेगवेगळ्या व्यवसायात प्राविण्य असल्याने आपल्या योग्य व्यवसाय करतात आणि इतर पंथ धर्म वाले त्याच्या कडून सेवा, माल इत्यादी घेतात आणि समाज सुरळीत पणे चालत असे. दोन धर्मीय यांच्यात तेढ वाढवून आपला स्वार्थ साधन करण्याचे राजकारण इंग्रजांनी केले तेच पुढे ह्या निर्लज्ज राजकीय लोकांनी चालवले आहे. अन्यथा अशा किती तरी सेवा आपण सर्वांकडून घेतच होतो आणि काही दुरावा व तेढ नव्हती समाजात. गलिच्छ जातीवादी लोक सोडून आपण जोवर शहाणे होत नाही तोवर हे अशाच पोळ्या शेकणार!


### आपण काय करू शकतो?

देशातून जातीयवाद समूळ नष्ट होण्यासाठी काय केले पाहिजे? जातीयता आजही का टिकून आहे? ती जात नाही म्हणजे तीला पोसणारे कोण आहेत? त्यांची मानसिकता काय आहे? सरकारी कागद पत्रावरुन 'जात' हा कॉलम सरकार का काढुन टाकत नाही? जात कोणाला हवी आहे?वरच्या जातीना हवी? की खालच्या जातीना?राखीव जागांचा किती? कोणाला? फायदा-तोटा झाला? समाज सुधारला का? किती टक्के सुधारला? सरकारी नोकरीत राखीव जागा न भरल्याने लाखों राखीव जागांचा अनुषेश बाकी का राहिला? आपल्या देशात आपण एका बाजूला जातीभेद निर्मूलनासाठी प्रयत्न करत आहोत आणि दुस?या बाजूला जातीवर आधारित संघटना निर्माण करत आहोत. मोठ्या शहरांत जातीभेद कमी होतो आहे असं वाटतं, तरुण मुलंमुली आंतरजातीय विवाह करतात. अतिशय छोट्या प्रमाणात का होईना पण या गोष्टी होत आहेत. कालांतराने पण प्रयत्नपूर्वक जातीभेद नष्ट होतील अशी आशा नक्कीच आहे.

---

# इन्दोराचा बालेकिल्ला वाचेल का?

### रिपब्लिकन चळवळीची कसोटी पुन्हा एकदा गंभीर



प्रमोद जांभुळकर
नागपूर.
९८२३९६९०९७

उत्तर नागपूरातील इन्दोरा ही फक्त भौगोलिक वस्ती नाही–ती एक आंदोलनात्मक परंपरा, सामाजिक न्यायाची भूमी आणि अनेक पिढ्यांनी जपलेल्या रिपब्लिकन चळवळीची राजकीय ओळख आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी पेटलेली ही वस्ती बऱ्याच दशकांपासून दलित राजकारणाची, संघटनात्मक शक्तीची आणि चळवळीवरील भावनिक निष्ठेची केंद्रबिंदू म्हणून ओळखली जाते. परंतु प्रश्न आज अधिक गंभीर झाला आहे, उपेंद्र शेंडे यांच्यानंतर इन्दोराचा हा बालेकिल्ला रिपब्लिकन जनतेच्या हातात टिकून राहू शकेल का?

**परंपरेचा अभिमान पण राजकारणातील बदलाची गती वेगवान**

दीर्घकाळ इन्दोरामध्ये रिपब्लिकन विचारांची मजबूत छाप राहिली. नगरसेवक असोत वा आमदार, इथे निर्णयांमध्ये नेहमीच जडणघडणीतून आलेली सामाजिक जाणीव दिसून येत असे.परंतु गेल्या दशकात राजकीय समीकरणांच्या नव्या लाटांनी परिस्थिती बदलायला सुरुवात केली.

मोठे राष्ट्रीय पक्ष स्थानिक पातळीवर अधिक आक्रमक झाले .विकास आणि व्यक्तिमत्त्व-आधारित प्रचाराने मतदारांचे लक्ष आकर्षित केले तरुण पिढीला स्थानिक नेतृत्वापेक्षा व्यापक पक्षसंघटनांकडून अधिक अपेक्षा वाटू लागल्या .या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन चळवळीच्या अंतर्गत असलेली विभागणी, वैचारिक संघर्ष, आणि नेतृत्वाच्या वारसाचा प्रश्न अधिक तीव्र झाला.

**उपेंद्र शेंडे यांची परंपरा आणि रिक्तता**

उपेंद्र शेंडे यांनी इन्दोरामध्ये सामाजिक उभारणीतून उभे राहिलेले एक जनतेचे नेतृत्व म्हणून स्वतःला सिद्ध केले होते. त्यांच्या कार्यपद्धतीत संपर्क, संघर्षआणि संघटनेच्या सूत्रांची ताकद यांचा दृढ प्रभाव होता.त्यांच्यानंतर निर्माण झालेली रिकामी जागा केवळ व्यक्तीची नाही; ती नेतृत्वशैलीची, लोकांशी असलेल्या भावनिक नात्याची आणि आंदोलनात्मक ऊर्जेची रिक्तता आहे.

**मग बालेकिल्ला वाचू शकतो का?**

**हो, पण अटींसह**

रिपब्लिकन जनता हा बालेकिल्ला वाचवू शकते– पण त्यासाठी तीन मूलभूत बदल आवश्यक आहेत.

**अंतर्गत एकजूट..तुटलेल्या विटांना पुन्हा एकत्र आणणे**

रिपब्लिकन चळवळीतील गटबाजी ही आजची मोठी अडचण आहे. इन्दोरा वाचवायचा असेल, तर स्थानिक स्तरावरः

सामूहिक नेतृत्व,समान अजेंडाआणि सुसंगत संघटनात्मक शिस्त या तिन्ही गोष्टी एकत्र आणाव्या लागतील.

तरुण नेतृत्वाचा उदय,आजची पिढी कोणाचा वारसा? पेक्षा कोण काय करू शकतो? यावर विश्वास ठेवते. इन्दोरातील युवा वर्गासाठी शिक्षण, रोजगार, नागरी सुविधा, डिजिटल पायाभूत रचना या प्रश्नांवर ताज्या चेहऱ्यांनी मार्क केले तरच रिपब्लिकन विचारांना नवी ऊर्जा मिळू शकते.

**चळवळ + विकास मॉडेल**

लोक आता फक्त चळवळ पाहून मतदान करत नाहीत; त्यांना परिणाम हवे आहेत.

**इन्दोरा सारख्या वस्तीतील प्रमुख प्रश्नः**

पायाभूत सुविधा,आरोग्यसेवा,सार्वजनिक वाहतूक, शैक्षणिक संधी, सुरक्षा आणि नागरी व्यवस्थापन या विषयांवर ताकदवान योजना आणि सातत्यपूर्ण अंमलबजावणी दाखवली तरच लोकांचा विश्वास पुन्हा दृढ होईल.

**लोकभावनेचा केंद्रबिंदू – स्वाभिमान**

इन्दोरा हा फक्त मतदारसंघ नाही. ते आंबेडकरी समाजाच्या स्वाभिमानाचे प्रतीक आहे. म्हणूनच राष्ट्रीय किंवा प्रादेशिक पक्षांच्या मोठ्या शक्तीसुद्धा इथे सहजपणे अंकुरू शकत नाहीत. जोपर्यंत स्थानिक लोकांच्या भावनिक संरचनेत प्रवेश मिळत नाही. हेच रिपब्लिकन जनतेचे सर्वात मोठे बळ आहे. पण हे बळ टिकवण्यासाठी संवाद, संघटन आणि कार्यक्षम नेतृत्व आवश्यक आहे.

**लढा अजूनही शक्य आहे**

इन्दोराचा बालेकिल्ला हरवलेला नाही, फक्त संघटनात्मक घडी विस्कटलेली आहे.

**रिपब्लिकन जनताः**

आपसांत एकजूट निर्माण करू शकली,नवे नेतृत्व घडवू शकली, आणि परंपरेबरोबर आधुनिकतेचे मिश्रित मॉडेल स्वीकारू शकली तर इन्दोराचा बालेकिल्ला केवळ वाचणार नाही, तर पुन्हा एकदा रिपब्लिकन चळवळीचा अग्रगण्य दीपस्तंभ ठरू शकतो.

---

# कर्जाच्या विळख्यातून थेट मृत्यूच्या दारात!

## सावकारी, मानव तस्करी आणि अपयशी कायदेव्यवस्था



दिपक कैतके
मुंबई.

महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीच्या घोषणा, योजनांची आकडेवारी आणि सरकारी दावे सतत मांडले जातात. मात्र चंद्रपूर जिल्ह्यात घडलेली एक धक्कादायक घटना या सर्व दाव्यांवर पाणी फेरणारी आहे.

सावकारी कर्ज फेडण्यासाठी एका शेतकऱ्याला थेट कंबोडिया येथे नेऊन त्याची किडनी काढण्यात आली. ही घटना केवळ सामाजिक शोषणाचे उदाहरण नाही, तर भारतातील मानव तस्करी, अवयव तस्करी आणि कायद्यांच्या अंमलबजावणीतील गंभीर अपयशाचे जिवंत चित्र आहे.

हा शेतकरी कुठलाही गुन्हेगार नव्हता. निसर्गावर अवलंबून असलेली शेती, वाढता खर्च, बाजारातील अनिश्चितता आणि बँकिंग व्यवस्थेची मर्यादा यामुळे तो सावकाराच्या दारात गेला. सावकारीविरोधी कायदे अस्तित्वात असतानाही ग्रामीण भागात सावकारांचा धाक कायम आहे, हे या घटनेतून पुन्हा सिद्ध होते.

**कर्जातून मुक्तीचे आमिष आणि अवयव तस्करी**

कर्जाच्या तगाद्याने हतबल झालेल्या शेतकऱ्याला एका एजंटने कंबोडियात किडनी दिल्यास आठ लाख रुपये मिळतील, असे आमिष दाखवले. कायद्याच्या भाषेत हा प्रकार Human Trafficking for Organ Removal या अत्यंत गंभीर गुन्ह्याच्या श्रेणीत येतो.

भारतामध्ये मानव तस्करीविरोधी कायदेशीर चौकट स्पष्ट आहे. भारतीय दंड विधान संहिता मधील कलम ३७० आणि ३७० (अ) नुसार मानव तस्करी हा गंभीर गुन्हा असून, फसवणूक, आमिष, दबाव किंवा असहाय्यतेचा फायदा घेऊन व्यक्तीचे शोषण करणे हा गुन्हा ठरतो. अवयव काढण्यासाठी एखाद्याला परदेशात नेणे हे थेट या कलमांतर्गत येते.

याशिवाय, Transplantation of Human Organs and Tissues Act, 1994 (मानव अवयव व ऊती प्रत्यारोपण कायदा) अंतर्गत पैशाच्या मोबदल्यात अवयव देणे किंवा घेणे पूर्णतः बेकायदेशीर आहे.

या कायद्यानुसार अशा गुन्ह्यात सहभागी असलेल्यांना कठोर शिक्षा आणि मोठा दंडाची तरतूद आहे. तरीही या शेतकऱ्याला परदेशात नेऊन किडनी काढली जाते, याचा अर्थ या कायद्यांचा भंग केवळ देशांतर्गतच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर झाला आहे.

**आंतरराष्ट्रीय रॅकेट आणि IT Act चा मुद्दा**

आजकाल अशा व्यवहारांमध्ये मोबाईल, सोशल मीडिया, व्हॉट्सॲप कॉल्स आणि डिजिटल माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे या प्रकरणात InformationTechnology Act, 2000 मधील तरतुदीही लागू होऊ शकतात. फसवणूक, बनावट माहिती, डिजिटल माध्यमांतून आमिष दाखवणे आणि आंतरराष्ट्रीय नेटवर्क उभारणे, हे सर्व सायबर गुन्ह्यांच्या चौकटीत येते.

**प्रशासन कुठे अपयशी ठरले?**

या घटनेत सर्वात गंभीर प्रश्न असा आहे की एवढा मोठा गुन्हा घडत असताना प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि संबंधित यंत्रणांना याची चाहूल कशी लागली नाही?

परदेशात जाणाऱ्या नागरिकांची माहिती, मेडिकल व्हिसा, ट्रान्सप्लांटशी संबंधित हालचाली–या सर्व बाबींचे निरीक्षण करणारी यंत्रणा असूनही हा प्रकार उघडकीस यायला वेळ लागतो, हे अत्यंत चिंताजनक आहे.

किडनी काढल्यानंतर शेतकऱ्याला संपूर्ण पैसे न मिळणे, त्याची प्रकृती ढासळणे आणि उपचारासाठीही साधनांची कमतरता असणे, ही या शोषणाची दुसरी भीषण बाजू आहे. कर्जमुक्तीचे स्वप्न पाहणारा शेतकरी आज आयुष्यभराच्या आजाराच्या गर्तेत अडकला आहे.

**ही केवळ एक घटना नाही**

ही घटना अपवाद नाही, तर व्यवस्थेतील मोठ्या त्रुटींचे द्योतक आहे. सावकारी, मानव तस्करी आणि अवयव तस्करी यांचे हे साखळी स्वरूपातील गुन्हे आहेत. कायदे आहेत, पण त्यांची प्रभावी अंमलबजावणी नाही. जो शेतकरी देशासाठी अन्न पिकवतो, त्याला स्वतःचे अवयव विकण्यापर्यंत मजल जावी, ही बाब राज्य आणि समाजासाठी आत्मपरीक्षणाची वेळ आहे.

आज गरज आहे ती केवळ सहानुभूतीची नाही, तर कठोर कायदेशीर कारवाईची. या प्रकरणाची सखोल चौकशी, आंतरराष्ट्रीय रॅकेटचा पदार्फाश आणि दोषींना कठोर शिक्षा झाली, तरच अशा घटनांना आळा बसेल. अन्यथा प्रश्न तसाच राहील–कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्याने पुढे काय विकायचे? जमीन, आयुष्य की उरलेले अवयव?

---

# जेवल्यावर लगेच सुस्ती का येते?



बरेच लोक जेवताच झोपू लागतात. अनेकदा लोक याला आळशीपणा समजतात, पण प्रत्यक्षात ते शरीराचे एक महत्त्वाचे लक्षण आहे. आयुर्वेदानुसार हे मंद अग्नीचे म्हणजेच कमकुवत पचनशक्तीचे लक्षण आहे.

जेव्हा अग्नी क्षीण होतो, तेव्हा अन्न पचवण्यासाठी शरीराला अधिक कष्ट करावे लागतात. पचनक्रियेत ऊर्जा येऊ लागते, त्यामुळे मेंदूपर्यंत ऊर्जा थोडी कमी पोहोचते आणि आपल्याला झोप येऊ लागते. आयुर्वेदाचा असा विश्वास आहे की अग्नी ही शरीराची खरी ऊर्जा आहे. जर ते कमी झाले तर कमी पचलेले अन्न तयार होण्यास सुरवात होते, ज्यामुळे जडपणा, सुस्तपणा आणि मंदपणा होतो. थंड, शिळे किंवा खूप जड अन्न शेकोटीला अधिक कमकुवत बनवते, तर गरम, हलके व ताजे अन्न अग्नीला बळकट करते. जेवल्यावर लगेच झोप येणे ही एक सामान्य शारीरिक प्रतिक्रिया आहे, ज्यामागे काही शास्त्रीय कारणे आहेत.

जेवणानंतर पचनक्रिया सुरु होते. अन्न पचवण्यासाठी शरीरात जठरांत्रातील रक्तप्रवाह वाढतो, आणि मेंदूला काही प्रमाणात कमी रक्तपुरवठा होतो. यामुळे मेंदूची सक्रियता कमी होते आणि झोप येण्याची भावना वाढते. अन्न जास्त प्रमाणात खाल्ले असल्यास, विशेषतः कार्बोहायड्रेट आणि फॅट्सयुक्त अन्न, शरीरातील रक्त शर्करेची पातळी वाढवते. ह्यामुळे इंसुलिनची निर्मिती वाढते, आणि शरीरात सेरोटोनिन व मेलाटोनिन या न्यूरोट्रांसमीटरचे प्रमाण वाढते, जे थकवा आणि झोप येण्यास कारणीभूत ठरतात.

त्याचबरोबर, पचनाच्या प्रक्रियेत ऊर्जा लागते, आणि शरीराचा ऊर्जा वापर पचनाकडे वळतो. त्यामुळे मेंदू आणि स्नायूंना कमी जागरूकता अनुभवायला मिळते. काही लोकांमध्ये हे प्रमाण जास्त असल्यास झोप फार खोल येते, ज्यामुळे कामात किंवा लक्ष केंद्रीत करण्यात अडचण येते.

झोप येण्याची तीव्रता कमी करण्यासाठी हलके अन्न खाणे, फळे व भाजीपाला समाविष्ट करणे, तसेच जेवणानंतर थोडी चालणे किंवा हलकी क्रिया करणे फायदेशीर ठरते. जेवल्यानंतर झोप येणे हे शरीराचे नैसर्गिक संकेत असून, पचन आणि न्यूरोट्रांसमीटरच्या बदलांमुळे होते. वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिले तर अन्न खाल्ल्यानंतर शरीराचा रक्तप्रवाह पोटाच्या दिशेने वाढतो ज्यामुळे पचनक्रिया सुधारता येते.

या काळात मेंदूला थोडे कमी रक्त आणि ऑक्सिजन मिळतो, त्यामुळे शरीर रिलॅक्स मोडमध्ये जाते आणि झोप येते. खाल्ल्यानंतर मधुमेहावरील रामबाण उपाय आणि इतर पाचक हार्मोन्स देखील वाढतात, ज्यामुळे शरीरात थोडासा सुस्तपणा येतो.

विशेषतः जर तुम्ही खूप जड पदार्थ खाल्ले असतील तर हा परिणाम आणखी जाणवतो. खाण्याच्या सवयीही यात मोठी भूमिका बजावतात. चटकन खाणे, कमी चावणे, भूक न लागल्यावर खाणे किंवा गरजेपेक्षा जास्त खाणे, या सर्व सवयी सुस्ती वाढवतात. आयुर्वेदात पोट भरण्याचा नियम ७० टक्के आहे. प्लेट जितकी भरली जाईल तितकी जास्त झोप येईल. थंड पाण्यामुळे पचनक्रिया देखील कमी होते आणि सुस्तपणा देखील वाढतो.

दोषाच्या असंतुलनामध्ये, विशेषतः जेव्हा कफ वाढतो तेव्हा अधिक जडपणा आणि झोप येते. गोड खाल्ल्याने इन्सुलिन लगेच वाढते आणि नंतर अचानक खाली पडते, ज्यामुळे पापण्या जड होतात. दह्याबरोबर तळलेले अन्न, दुधाबरोबर आंबट अन्न किंवा अन्नासोबत फळे खाणे अशा चुकीच्या अन्नपदार्थांमुळे शरीरातील विषारी पदार्थ वाढतात आणि पचनक्रिया आणखी कमकुवत होते.

नेहमी गरम आणि ताजे अन्न खावे, हळू हळू खावे आणि चांगले चावून खावे, खाण्यापूर्वी कोमट पाणी घ्या, खाल्ल्यानंतर ५ मिनिटे हलके चालावे.

---

वाचक लिहितात

### राष्ट्रभक्तीची ओळख करून देणे ही गरज नव्हे जबाबदारी

सध्याच्या संसदेतील चर्चांमध्ये भारतीय युवकांना त्यांच्या हिंदू ओळखीची जाणीव पुन्हा दृढ करण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आहे. प्राचीन परंपरेत हिंदू हा शब्द केवळ धर्मनाव नसून उत्तम गुणांचा स्वीकार आणि दुगुर्णांचा त्याग अशी जीवनमूल्ये सांगणारी संकल्पना आहे. उपनिषदांनी हिंदूची व्याख्या हिनानि गुणानि दूषयती इति हिंदुः अशी केली आहे. वीर सावरकरांनी सिंधूपासून कन्याकुमारीपर्यंतच्या भारतभूमीला पितृभूमी आणि पुण्यभूमी मानणाऱ्यांना हिंदू म्हटले आहे. भारतीय संस्कृतीत मातृभूमीला सर्वोच्च स्थान असून माता आणि मातृभूमी स्वर्गापेक्षा श्रेष्ठ ही भूमिका आजही राष्ट्रभक्तीची ओळख आहे.

परंतु आजच्या राजकीय आणि सामाजिक वातावरणात हिंदू राष्ट्र हा शब्द चर्चेतून लोप पावत असून, जातीय राजकारण व इतिहासाच्या विकृत सादरीकरणामुळे युवकांमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याचे चित्र आहे.

अशा परिस्थितीत त्यांना आपल्या संस्कृतीची, परंपरेची आणि राष्ट्रभक्तीची ओळख करून देणे ही गरज नव्हे तर जबाबदारी ठरते. हनुमंताला जामवंतांनी जशी शक्तीची जाणीव करून दिली, तशीच जाणीव आज युवकांना करून देणे काळाची मागणी आहे. ह्यवंदे मातरम् म्हणताना जागणारी मातृभूमीविषयीची निष्ठा पुढील पिढीपर्यंत पोहोचणे अत्यावश्यक आहे.

■ सौ. रमा देशमुख, नागपूर.


### विदर्भाचे कोणते आणि किती प्रश्न निकाली निघाले?

महाराष्ट्र विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन नुकतेच नागपूर येथे झाले. विदर्भातील प्रश्न येथे चर्चिले जावेत, ते निकाली निघावेत या हेतूने हे अधिवेशन घ्यायचे असते. तथापि, यावेळी सात दिवसांच्या अधिवेशनात विदर्भाचे किती प्रश्न चर्चेला आले? विदर्भातीलच किती आमदारांनी त्यावर चर्चा घडवून आणली? अधिवेशनात मुंबई, पुण्याकडचे अधिक विषय आलेत, काही दिवस तर बिबट्या गाजले? असेच थोतांड सुरू राहिले तर हे अधिवेशन निव्वळ आणि दिखावा कोट्यवधीचा चुराडा करणारे ठरावे.

■ विनायक कोरडे, नागपूर.

---

अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

## जर – तर!

**विवाहीत म्हणून मंगळसुत्र**
**अनिवार्य महिलांसाठी**
**तसच असायला हवं होतं**
**काही तरी पुरुषांसाठी..!**

**थोडा तरी बसला असता**
**फसवेगिरीला आळा**
**महिलांनाही समजलं असतं**
**जपुन चालावं बाळा..!**

**वैवाहीक बंधन , मंगळसुत्र**
**आहेत कृत्रिम बंधने**
**खरं तर मनाचा संयम**
**नैतिकता हीच खरी आभूषणे ..**

## एआय+ नोव्हाफ्लिपसह फ्लॅगशिप लीगमध्ये सामील झालात्याच्या नवीन मालिकेचा पहिला लाँच



**नवी दिल्ली, १६ डिसेंबर :** एआय+ स्मार्टफोन्सने आज नोव्हाफ्लिप ची घोषणा केली, ही प्रीमियम फ्लिप स्मार्टफोन मार्केटमध्ये एक नाविन्यपूर्ण भर आहे, ज्याची किंमत ४०,००० पेक्षा कमी आहे. हे कंपनीच्या उच्च-गुणवत्तेचे तंत्रज्ञान सर्वांना उपलब्ध करून देण्याच्या ध्येयाशी सुसंगत आहे. २०२६ च्या पहिल्या तिमाहीत रिलीज होणारे हे उपकरण एआय+ स्मार्टफोन्सच्या फ्लॅगशिप नोव्हा मालिकेची सुरुवात आहे, जी अत्याधुनिक नवोपक्रम आणि परवडणाऱ्या किमतीची जोड देते.

जुलै २०२५ मध्ये नोव्हा ५जी लाँचच्या यशावर आधारित, एआय+ स्मार्टफोन्स नोव्हा मालिकेसह त्यांचे प्रमुख उत्पादन पोर्टफोलिओ वाढवत आहे, ज्यामध्ये नोव्हा प्रो, नोव्हा अल्ट्रा, नोव्हा फ्लिप आणि भविष्यात फोल्ड व्हेरिएंट सारखे मॉडेल समाविष्ट आहेत. प्रत्येक डिव्हाइस जाणूनबुजून उत्कृष्ट कामगिरी, अद्वितीय वैशिष्ट्ये आणि स्मार्टफोन उद्योगात एक नवीन बेंचमार्क सेट करणारा वापरकर्ता अनुभव देण्यासाठी डिझाइन केले आहे.

फ्लिप स्मार्टफोन्स लोकांना खरोखरच चुकवलेल्या गोष्टी परत आणतात: कॉम्पॅक्टनेस, शारीरिक संवाद आणि नियंत्रणाची भावना, एआय+ स्मार्टफोन्सचे सीईओ आणि नेक्स्टक्वांटम शिफ्ट टेक्नॉलॉजीज चे संस्थापक माधव शेठ म्हणाले. त्या अनुभवात नॉस्टॅल्जिया आहे, परंतु त्यामागे एक अतिशय आधुनिक गरज देखील आहे.

ते पुढे म्हणाले, नोव्हाफ्लिपमध्ये आजच्या आधुनिक स्मार्टफोनसाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टींची ओळख करून दिली आहे. हा एक फ्लिप फोन आहे जो सध्याच्या जीवनशैलीत बसतो, उद्देशपूर्ण, अर्थपूर्ण आणि अशा क्षणांसाठी डिझाइन केलेला आहे जेव्हा तुम्हाला जलद कनेक्ट व्हायचे असेल किंवा डिस्कनेक्ट व्हायचे असेल. नोव्हाफ्लिपचे लाँचिंग एआय+ स्मार्टफोन्ससाठी ५जी रोडमॅपमध्ये एक महत्त्वाचा टप्पा आहे, जो प्रीमियम मार्केटच्या गरजा पूर्ण करण्यासाठी स्मार्टफोन पोर्टफोलिओमध्ये विविधता आणण्याच्या ब्रँडच्या वचनबद्धतेला बळकटी देतो आणि त्याचबरोबर बजेट-फ्रेंडली देखील आहे.

पहिल्या तिमाहीत लाँचिंगमध्ये नोव्हाफ्लिप संपूर्ण उत्पादन तपशील आणि उपलब्धतेसह सादर केला जाईल, जो एआय+ स्मार्टफोन्सच्या फ्लॅगशिप नोव्हा मालिकेची सुरुवात दर्शवेल.

## शालिनीताई मेघे हॉस्पिटलमध्ये प्रगत जीआय सर्जरीमुळे मध्यमवयीन महिलेचा जीव वाचला

**नागपूर, १६ डिसेंबर :** अलीकडेच, एक मध्यम वयाची महिला वानाडोंगरी, नागपूर येथील १०२० बेड असलेल्या शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर मध्ये दाखल झाली. ती अनेक महिन्यांपासून वारंवार होणाऱ्या कोलेंजायटिसच्या (पित्तनलिकेत संसर्ग) त्रासाने त्रस्त होती. काही वर्षांपूर्वी तिच्यावर ओपन कोलेसिस्टेक्टॉमी आणि कॉमन बाइल डक्ट (सीबीडी) एक्सप्लोरेशन ही शस्त्रक्रिया करण्यात आलेली होती ज्यामुळे तिला पित्तनलिकेच्या खालच्या भागातील सीबीडीमध्ये कायमस्वरूपी अडथळा निर्माण झाला होता. तिने बाहेरील रुग्णालयात अनेक वेळा ईआरसीपी प्रक्रियेच्या मदतीने, सीबीडी साफ करणे, स्टेंट बसवणे, बायलीयरी ड्रेनेज आणि इतर उपचार केले, परंतु तिला यापासून कायमस्वरूपी आराम मिळत नव्हता. तिचा पिवळा कावीळ (जॉन्डिस) वाढत गेला, भूक कमी झाली आणि वारंवार हॉस्पिटलमध्ये जावे लागत असल्यामुळे ती शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या थकली होती. काही शुभचिंतकांनी तिला परवडणारी आणि दर्जेदार उपचारासाठी शालिनीताई मेघे हॉस्पिटल मध्ये जाण्याचा सल्ला दिला.

शालिनीताई मेघे हॉस्पिटलमध्ये पोहोचल्यावर, शस्त्रक्रियेच्या विभागाने पुनरावृत्ती होणाऱ्या इन्फेक्शन आणि बायलीयरी अडथळ्याचे मूळ कारण ओळखण्यासाठी सखोल शारीरिक आणि रेडियोलॉजिकल तपासणी केली. विभागप्रमुख डॉ. राजीव सोनारकर यांनी सांगितले, सविस्तर तपासणीनंतर बहुविभागीय तज्ज्ञांनी ठरवले की पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी आणि रुग्णाला कायमस्वरूपी आराम देण्यासाठी शस्त्रक्रिया करणे आवश्यक आहे. यासाठी कोलेडोकोडुडेनोस्टॉमी ही शस्त्रक्रिया ठरवण्यात आली, ज्यात कॉमन बाइल डक्ट थेट



ड्युओडेनमशी जोडले जाते ज्यामुळे पित्ताचा प्रवाह सुरळीत राहतो.

ही यशस्वी कामगिरी सर्जरी विभागाच्या एकत्रित प्रयत्नांमुळे शक्य झाली, ज्याचे नेतृत्व डॉ. सुधीर टोमे, सीनियर जीआय सर्जन आणि अ‍ॅड्जंक्ट फॅकल्टी, यांनी केले. त्यांना डॉ. राजीव सोनारकर (एचओडी शस्त्रक्रिया), डॉ. आरती किरंगे (जीआय सर्जन), डॉ. वंदना टोमे, डॉ. दानिश, डॉ. आशिष आणि डॉ. रुपेश यांनी मदत केली, तसेच ज्युनिअर रेसिडेंट्स डॉ. संदीप, डॉ. गौरव, डॉ. सिमरन आणि डॉ. अमेव यांनीही महत्वपूर्ण भूमिका बजावली. शस्त्रक्रियेच्या आधी, दरम्यान आणि नंतरची काळजी अ‍ॅनेस्थेशिया टीमने उत्तम प्रकारे घेतली, ज्यात डॉ. देशमुख, डॉ. अंजली मोडक, डॉ. रंजीत, डॉ. शिवानी आणि ज्युनिअर रेसिडेंट डॉ. जोसेफ यांचा समावेश होता.

या प्रकरणात महत्त्वाची मदत केल्याबद्दल एमजेपीजेएवाय टीमचे आभार मानण्यात आले. या टीमचे नेतृत्व डॉ. सुधीर सिंह (एएमएस) यांनी केले असून, श्री. अहमिंद्र जैन यांनी त्यांना वेळेवर मंजुरी मिळवून देण्यात मदत केली. दुर्मिळ एबी-निगेटिव्ह रक्त आणि प्लाझ्माची व्यवस्था केल्याबद्दल ब्लड बँकचेही अभिनंदन केले.

डॉ. अनुप मरार, डायरेक्टर, नागपूर कॅम्पस डीएमआयएचईआर (डीयू) यांनी सांगितले, ही केस शालिनीताई मेघे हॉस्पिटल मधील टीमवर्क, वैद्यकीय कौशल्य आणि सहानुभूतीपूर्ण सेवेचे उत्तम उदाहरण आहे. एमजेपीजेएवाय योजनेअंतर्गत इतकी गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीपणे करून रुग्णाला दिलासा देणे म्हणजे सर्वसामान्यांना प्रगत शस्त्रक्रिया उपलब्ध करून देण्याच्या आमच्या ध्येयाची पूर्तता आहे. त्यांनी संपूर्ण शस्त्रक्रिया विभाग, अ‍ॅनेस्थेसिया टीम, नर्सिंग आणि इतर सर्व सहाय्यक टीमचे समर्पण आणि उत्कृष्ट कार्याबद्दल अभिनंदन केले. शालिनीताई मेघे हॉस्पिटल मध्ये आमचे ध्येय नेहमीच नैतिक, रुग्ण-केंद्रित आणि उच्च दर्जाची आरोग्यसेवा प्रत्येक रुग्णाला उपलब्ध करून देणे हेच आहे, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. वसंत गावंडे, सीएमएस एसएमएचआरसी यांनी सांगितले की रुग्ण आणि तिच्या कुटुंबाने संपूर्ण शालिनीताई मेघे हॉस्पिटल टीमचे मनापासून आभार मानले. रुग्णाला मिळालेली सहानुभूतीपूर्ण, निस्वार्थ आणि मानवतेची सेवा त्यांना अत्यंत भावली. अनेक महिन्यांच्या वेदना, वारंवार होणाऱ्या प्रक्रिया आणि अनिश्चितता अनुभवल्यानंतर शालिनीताई मेघे हॉस्पिटलमध्ये मिळालेल्या उपचारांनी रुग्णाला केवळ बरे केले नाही तर त्यांच्या कुटुंबाच्या मनात पुन्हा आशा आणि आत्मविश्वास निर्माण केला, असे कुटुंबाने सांगितले. योग्य वेळी घेतलेल्या निर्णयांचे, संपूर्ण टीमचे समन्वयित काम आणि एवढी प्रगत शस्त्रक्रिया आर्थिक ओझा न पडता उपलब्ध करून दिल्याबद्दल कुटुंबीयांनी विशेष आभार मानले. त्यांच्या कृतज्ञतेच्या शब्दांनी हॉस्पिटलच्या संवेदनशील, रुग्ण-केंद्रित सेवेसाठीची वचनबद्धता स्पष्ट दिसून आली..

## सॅमसंगकडून भारतात ३० वर्षे साजरी करण्यासह नवीन नाविन्यता दृष्टिकोनाचे अनावरण

**मुंबई, १६ डिसेंबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज नवीन धोरणात्मक दृष्टिकोन #PoweringInnovationforIndia चे अनावरण केले, जो देशातील ब्रँडच्या विकासाच्या पुढील टप्प्यामध्ये ग्राहक-केंद्रित नाविन्यता, भारतीय टॅलेंट आणि भारत-नेतृत्वित उत्पादन विकासाला प्राधान्य देतो.

भारतातील कार्यसंचालनांच्या ३० वर्षांना साजरे करत सॅमसंगचा नवीन दृष्टिकोन भारतातील डिजिटल परिवर्तन, मेक इन इंडिया उत्पादन महत्त्वाकांक्षा आणि नाविन्यता-संचालित आर्थिक विकासामधील दीर्घकालीन सहयोगी म्हणून त्यांची कटिबद्धता अधिक प्रबळ करतो.

१९९५ मध्ये भारतात प्रवेश केल्यापासून सॅमसंगने घरगुती मनोरंजनाला नव्या उंचीवर नेलेले टेलिव्हिजन्स लाँच करण्यापासून नोएडामध्ये जगातील सर्वात मोठे मोबाइल उत्पादन प्लांट स्थापित करण्यामध्ये विस्तार केला आहे, तसेच भारतात डिझाइन केल्या जाणाऱ्या नाविन्यतांना चालना देत आहे, जे आता त्यांच्या जागतिक परिसंस्थेला पाठिंबा देतात.

१.११ लाख कोटी रूपयांच्या महसूलासह सॅमसंग एण्ड-टू-एण्ड एआय परिसंस्था असलेला भारतातील एकमेव ब्रँड आहे, तसेच स्मार्टथिंग्जच्या माध्यमातून गॅलेक्सी एआय (स्मार्टफोन्स, टॅब्लेट्स, वीअरेबल्स), बीस्पोक एआय (रेफ्रिजरेटर्स, वॉशिंग मशिन्स व एसी) आणि व्हिजन एआय (टेलिव्हिजन्स व स्मार्ट मॉनिटर्स) यांना एकत्र आणत आहे.

१९९५ मध्ये उदारीकरणामुळे नवीन संधी निर्माण होत असताना भारतात आमच्या पहिल्या टीव्हीची विक्री करण्यापासून आज भारतासाठी सर्वात विश्वसनीय तंत्रज्ञान सहयोगी बनण्यापर्यंत सॅमसंगच्या प्रवासाला भारतीयांचा आत्मविश्वास,



सर्जनशीलता व अमर्यादित महत्त्वाकांक्षांनी आकार दिला आहे. आम्ही भारतातील घराघरांमध्ये आमचे स्मार्टफोन्स, टीव्ही, डिजिटल अप्लायन्सेस आणि विनासायासपणे कनेक्टेड परिसंस्थेच्या माध्यमातून सर्वात लोकप्रिय व सर्वाधिक अवलंब करण्यात आलेला ब्रँड बनलो आहोत. आम्हाला भारतातील लाखो कुटुंबांचे दैनंदिन जीवन सुलभ करण्याचा अभिमान वाटतो. भारतातील तरूणांची तंत्रज्ञान सुरक्षित, सर्वोत्तम व नेहमी सर्वसमावेशक असण्याची अपेक्षा आहे आणि आम्ही त्यांच्यासाठी वैयक्तिक नाविन्यता वितरित करण्याप्रती कटिबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की, भारत जगभरातील अर्थपूर्ण नाविन्यतेच्या भावी युगाचे नेतृत्व करेल, जेथे स्मार्ट होम्स, कनेक्टेड राहणीमान आणि सर्वोत्तम डिवाईसेसच्या भवितव्याला भारतातील सांस्कृतिक विविधतेला समजून घेणाऱ्या एआयसह झपाट्याने आकार मिळत आहे. आम्ही विकसित भारतासाठी भारत सरकारसोबत सहयोगाने काम करत राहू, ज्यासह डिजिटली सक्षम देश घडेल, जेथे नाविन्यता सर्वसमावेशक प्रगती व सहयोगाने समृद्धतेला चालना देईल. आमचा येथे प्रगत तंत्रज्ञान निर्माण करण्याचा स्पष्ट दृष्टिकोन आहे, जे जगभरातील व्यक्तींच्या राहण्याच्या, काम करण्याच्या आणि कनेक्ट होण्याच्या भावी पद्धतींना आकार देतील,'' असे सॅमसंग साऊथवेस्ट एशियाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जेबी पर्क म्हणाले.

## तेलंगणामध्ये गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुप १०,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करणार



**मुंबई/हैदराबाद, १६ डिसेंबर :** भारतातील सर्वात मोठ्या आणि सर्वात वैविध्यपूर्ण कृषी व्यवसायांपैकी एक गोदरेज अ‍ॅग्रोव्हेटची उपकंपनी असलेल्या क्रीमलाइन डेअरी प्रॉडक्ट्स लिमिटेडने आज तेलंगणा रायझिंग ग्लोबल समिट २०२५च्या निमित्ताने तेलंगणा सरकारसोबत सामंजस्य करार (एमओयू) केला. ४० एकर जागेवर अत्याधुनिक दुग्ध प्रक्रिया सुविधा उभारण्यासाठी कंपनी १५० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. या नवीन गुंतवणुकीसह, गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपच्या राज्यातील विविध व्यवसायांमधील एकूण गुंतवणूक आता १०,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त झाली आहे.

या सामंजस्य करारावर भाष्य करताना, तेलंगणाचे माननीय मुख्यमंत्री श्री. ए. रेवंत रेड्डी म्हणाले, सर्वसमावेशक विकासाला चालना देणारी गुंतवणूकदार-अनुकूल परिसंस्था निर्माण करण्यासाठी तेलंगणा कटिबद्ध आहे. गोदरेज उद्योग समूहासोबतची आमची भागीदारी याचाच पुरावा आहे. कृषी-अन्न प्रक्रिया क्षमता मजबूत करण्यापासून, या उद्योगांचा विस्तार करण्यापर्यंत आमच्या गुंतवणुकीमुळे औद्योगिक रोजगार वाढेल.

गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपच्या कार्यकारी उपाध्यक्ष पिरोजशा गोदरेज म्हणाल्या, तेलंगणा राज्यात आम्ही भक्कम स्थितीत आहोत. त्यामुळेच औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी, रोजगार निर्मितीसाठी आणि सार्वजनिक-खासगी सहकार्यात्मक दृष्टिकोनातून प्रभावी पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी हा सामंजस्य करार सामायिक वचनबद्धता प्रतिबिंबित करतो. दीर्घकालीन आणि शाश्वत तेल पाम वृक्ष लागवडीला चालना देण्यापासून ते शहरी गृहनिर्माण क्षेत्रात आपली उपस्थिती वाढवण्यापर्यंत आणि आमच्या दुग्धशाळेच्या यंत्रणेचा विस्तार करण्यापर्यंत तसेच डिजिटल-प्रथम उपायांद्वारे एमएसएमई वाढ सक्षम करण्यापर्यंत, तेलंगणा सरकारसोबतची आमची ही भागीदारी सर्वसमावेशक, नावीन्यपूर्ण आणि लवचिक भविष्य घडवण्याच्या दिशेने टाकलेले एक पाऊल आहे.

गोदरेज अ‍ॅग्रोव्हेट लिमिटेडचे सीईओ आणि एमडी सुनील कटारिया म्हणाले, तेलंगणासह भारतात पोषक दुग्धजन्य पदार्थांची ग्राहकांची मागणी चांगलीच वाढली आहे. शहरी जीवनशैलीचे परिणाम, आरोग्याप्रती वाढती जागरूकता आणि ग्राहकांची पौष्टिक अन्नाची गरज भागवणारा प्रथिनांचा मुख्य स्रोत म्हणून या दुग्धजन्य पदार्थांना चांगलेच महत्त्व आहे. दुग्धव्यवसाय हा प्रथिनांच्या सर्वात नैसर्गिक स्रोतांपैकी एक आहे आणि जवळजवळ तीन दशकांच्या आमच्या कौशल्यामुळे, गोदरेज जर्सी या परिवर्तनाचे नेतृत्व करण्यास वचनबद्ध आहे. तेलंगणा सरकारसोबतचा आमचा सामंजस्य करार हा अशा सुविधा उभारण्याच्या दिशेने एक पाऊल आहे जो राज्याच्या पोषण गरजा पूर्ण करण्यासाठी सर्वोत्तम दर्जाचे आणि नावीन्यपूर्ण प्रथिनयुक्त दुग्धजन्य पदार्थ तयार करेल. आणि त्याचबरोबर राज्यात रोजगाराच्या संधीही निर्माण होईल.

## एचडीएफसी बँके तर्फे देशभरांत ४००० हून अधिक सायबर फ्रॉड जागरुकतेसाठी कार्यशाळांचे आयोजन

**मुंबई, १६ डिसेंबर :** एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे त्यांच्या डिजिटल बँकिंग जागरुकता मोहिमचा एक भाग म्हणून संपूर्ण भारतात सायबर गुन्हेगारी विषयी जागरुकता कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. एप्रिल २०२५ पासून बँके तर्फे ४००० कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले असून या माध्यमातून २७००० नागरिकांना सुरक्षित डिजिटल बँकिंग विषयी शिक्षण देण्यात आले.

या कार्यशाळांच्या माध्यमातून शाळा आणि कॉलेजातील विद्यार्थी, वरिष्ठ नागरीक, स्वयंसहायता गट, ग्राहक आणि कर्मचाऱ्याना शिक्षण देण्यात येते. या संभाषणात्मक अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून सहभागी लोकांना सुरक्षित डिजिटल बँकिंगच्या पध्दतींसह कशा प्रकारे सायबर गुन्ह्यांपासून वाचण्याच्या पध्दतीं विषयी माहिती देण्यात आली. या कार्यशाळांमध्ये खरी उदाहरणे, गोष्टी आणि व्हिडिओजच्या माध्यमातून सहभागी लोकांना गुन्हेगारांची कार्यपध्दती आणि त्यांच्यापासून बचाव करण्याच्या टिप्स सुध्दा देण्यात आल्या. यातील काही कार्यशाळांचे आयोजन हे लॉ एन्फोर्समेंट एजन्सीज (एलईएज)च्या सहकार्याने करण्यात आले होते.

या कार्यशाळांमध्ये खालील विषयां वर माहिती देण्यात आली :

गुन्हेगारांच्या पध्दतींना ओळखणे : या सत्रामध्ये कशा प्रकारे गुन्हेगार पिडीत लोकांना भिती, घाई, लालच किंवा मदतीची याचना करतात हे समजावले. यावेळी डिजिटल अरेस्ट, इन्व्हेस्टमेंट स्कॅम, एपीके फ्रॉड्स, फिशिंग, स्मिशिंग, व्हिशिंग, सीम स्वॅप, रिमोट अ‍ॅक्सेस स्कॅम, यूपीआय फ्रॉड्स इत्यादीं विषयी च्या गोष्टी आणि प्रत्यक्ष घटनांबद्दलची माहिती देण्यात आली.

सुरक्षित बँकिंग साठी प्रत्यक्ष टिप्स : या कार्यशाळांमध्ये सुरक्षित बँकिंग करण्याचे महत्त्व अधोरेखित करुन ते कसे आचरणात आणावे, व्हिजिल आंटी सारख्या जागरुकता म्बेसेडर आणि कशा प्रकारे सोप्या टिप्स वापरुन ग्राहकांनी स्वत:ला सुरक्षित ठेवण्यासाठीची माहिती देण्यात आली.

गुन्हेगारीला बळी पडू नये यासाठी मार्गदर्शक तत्वे: योवळी उपस्थितांना कशा प्रकारे महत्त्वाची संवेदनशील माहिती देऊ नये, कधीही संशयास्पद लिंक्स वर क्लिक करु नये आणि कशा प्रकारे एसएमएस, ईमेल किंवा व्हॉट्सप वरुन अ‍ॅटेचमेंट सह आलेल्या एपीके फाईल्स विशेषकरुन सरकारी अधिकारी, बँका आणि अन्य संस्थां कडून आलेल्या फाईल्स डाऊनलोड करु नयेत या विषयी माहिती देण्यात आली.

यावेळी बोलतांना एचडीएफसी बँकेच्या क्रेडिट इंटेलिजन्स अ‍ॅन्ड कंट्रोल्स चे सिनियर एक्झिक्युटिव्ह व्हाईस प्रेसिडेंट मनीष अग्रवाल यांनी सांगितले गुन्हेगार नेहमीच सोशल इंजिनियरींग पध्दतींचा अवलंब करण्यासह तंत्रज्ञानाचा वापर ग्राहकांची दिशाभूल करुन त्यांचे शोषण करण्यासाठी करत असतात. म्हणूनच नागरिकांमध्ये ते वापरत असलेल्या गुन्हेगारी पध्दतीची माहिती करुन देणे आवश्यक आहे जेणेकरुन ते बँकिंग विषयीची गोपनीय माहिती देणार नाहीत किंवा माहिती नसलेल्या लिंक्सवर क्लिक करणार नाहीत. या कार्यशाळांचा मुख्य उद्देश हा की सहभागी लोकांना शिक्षण देऊन सुरक्षित बँकिंग विषयी माहिती देऊन त्यांना जागरुक करणे जेणेकरुन ते अशा ऑनलाईन गुन्ह्याचे शिकार होणार नाहीत.

## खास एअरबीएनबी अनुभवासह लोल्लापलूझा इंडिया २०२६ चा आनंद द्विगुणित होणार



**नागपूर, १६ डिसेंबर :** आपल्या पहिल्यावहिल्या जागतिक लाईव्ह म्युझिक पार्टनरशिपचा भाग म्हणून एअरबीएनबी २४ आणि २५ जानेवारी रोजी मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्स येथे होणाऱ्या लोल्लापालूझा इंडिया २०२६ मध्ये पाहुण्यांना एक त्यांच्या आवडत्या संगीताच्या जवळ आणणारा एक खास अनुभव देईल. हा भारतातील एअरबीएनबीसाठी एक रोमांचक नवीन अध्याय आहे, जो पर्यटन, संस्कृती आणि सर्जनशीलतेद्वारे लोकांना एकमेकांशी जोडण्याच्या वचनबद्धतेला बळकटी देतो.

बॅकस्टेज टूर्स आणि कलाकारांकडून ज्ञानवर्धक सर्जनशील सत्रांपासून ते लोल्लापालूझा इंडिया इनसाइडरच्या माध्यमातून बिहाइंड दि सीन प्रवेशापर्यंत प्रत्येक अनुभव भारतातील सर्वात सुंदर संगीत महोत्सवांपैकी एकाच्या निर्मितीमागील प्रयत्नांची एक अविस्मरणीय झलक देतो.

लाइव्ह संगीत आणि प्रवास नेहमीच एकमेकांसोबत चालले आहेत - चाहते महोत्सवांना फक्त उपस्थित राहत नाहीत, तर ते त्यांचे आयोजन करणाऱ्या शहरांचा शोध घेतात आणि एकमेकांशी नाते जोडतात. त्यातून आपल्या एखाद्या शहराच्या अनुभवाची व्याख्या निर्माण होते, असे एअरबीएनबीचे भारत आणि आग्नेय आशियाचे राष्ट्रीय प्रमुख अमनप्रीत बजाज म्हणाले. लोलापालूझासोबतची आमची भागीदारी या खास एअरबीएनबी अनुभवांच्या माध्यमातून चाहत्यांना त्या जगाच्या जवळ आणते. त्यामुळे या महोत्सवाचा अनुभव फक्त चाहते म्हणून नव्हे तर त्यांच्या कथेचा भाग असलेल्या व्यक्ती म्हणून घेण्याची दुर्मिळ संधी मिळते.

बुकमायशोचे लाईव्ह इव्हेंट्सचे मुख्य व्यवसाय अधिकारी नमन पुगलिया म्हणाले, लोल्लापालूझा इंडिया कायमच केवळ अत्यंत अद्वितीय कामगिरी करत आले आहे. ते संगीताभोवतीची संस्कृती, समाज आणि सर्जनशीलतेचे प्रतीक आहे. एअरबीएनबीसोबत आम्ही चाहत्यांना लोकसंस्कृती, कथा आणि महोत्सवाला आकार देणाऱ्या क्षणांचा अनुभव घेण्याची अभूतपूर्व संधी देऊन नाते अधिक दृढ करत आहोत. हे अनुभव लोल्लापालूझा इंडियाची एक वेगळी बाजू समाजासमोर आणतात जी जी मुख्यत्वे कर्मचारी आणि निर्मात्यांसाठी राखीव असते. त्यामुळे चाहत्यांना जागतिक दर्जाचा महोत्सव कसा जिवंत होतो हे पाहणे शक्य होईल.

## ॲक्सिस म्युच्युअल फंडकडून ॲक्सिस गोल्ड अँड सिल्व्हर पॅसिव्ह फंड ऑफ फंड्सची घोषणा

**मुंबई, १६ डिसेंबर :** देशातील आघाडीच्या मालमत्ता व्यवस्थापन कंपन्यांपैकी एक असलेल्या ॲक्सिस म्युच्युअल फंडने आज ॲक्सिस गोल्ड अँड सिल्व्हर पॅसिव्ह फंड ऑफ फंड (एफओएफ) सुरू करण्याची घोषणा केली. ही ओपन-एंडेड फंड ऑफ फंड्स योजना असून, त्यामध्ये सोने आणि चांदीच्या एक्स्चेंज ट्रेडेड फंड्स (ईटीएफ) च्या युनिट्समध्ये गुंतवणूक केली जाणार आहे. या योजनेचा न्यू फंड ऑफर (एनएफओ) सबस्क्रिप्शनसाठी खुला होणार असून तो २२ डिसेंबर २०२५ रोजी बंद होईल. ॲक्सिस गोल्ड अँड सिल्व्हर पॅसिव्ह एफओएफ याद्वारे गुंतवणूकदारांना एकाच गुंतवणूक पर्यायातून सोने आणि चांदी जगभरात मूल्य साठवणुकीचे विश्वासार्ह माध्यम मानले जाणारे दोन प्रमुख कमोडिटीजयांच्या कामगिरीत सहभागी होता येणार आहे. ही योजना पारदर्शक आणि सोयीस्कर पद्धतीने कमोडिटी गुंतवणुकीची संधी उपलब्ध करून देईल. या योजनेत प्रामुख्याने गोल्ड ईटीएफ आणि सिल्व्हर ईटीएफ च्या युनिट्समध्ये गुंतवणूक केली जाणार असून, दोन्ही कमोडिटीजमध्ये संतुलित वाटप (बॅलन्स्ड अलोकेशन) ठेवण्यावर भर दिला जाणार आहे.

योजनेच्या शुभारंभाबाबत बोलताना, बी. गोपकुमार, व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी (एमडी अँड सीईओ), ॲक्सिस एएमसी, यांनी सांगितले, सोने आणि चांदी या ऐतिहासिकदृष्ट्या महागाई आणि चलनातील चढ-उतारांपासून संरक्षण देणाऱ्या प्रभावी गुंतवणूक ठरल्या आहेत. त्याचबरोबर, पोर्टफोलिओमध्ये विविधीकरणाचे फायदेही देतात. ॲक्सिस गोल्ड अँड सिल्व्हर पॅसिव्ह एफओएफ च्या माध्यमातून आम्ही गुंतवणूकदारांना भौतिक स्वरूपात धातू ठेवण्याच्या गुंतागुंतीशिवाय, या मौल्यवान धातूंमध्ये गुंतवणूक करण्याचा एक सोपा आणि खर्चिकदृष्ट्या किफायतशीर पर्याय उपलब्ध करून देत आहोत.

### बुधवार दि. १७ डिसेंबर २०२५

| कल्याण बाजार (पत्थर फोड एकच) | | | | मुंबई बाजार (पत्थर फोड एकच) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ८ | ४ | ५ | ६ | ९ |
| १३७ | २३७ | १६८ | १८९ | १३० | २४९ | १७८ | १४४ |
| ३८० | ४८० | ३४८ | २६० | २४८ | ४५६ | ३५८ | ३७९ |
| २९० | ५७० | ४५० | ३५० | ६८० | ३५७ | २७७ | ४७८ |

| जोडी (कल्याण) | जोडी (मुंबई) |
|---|---|
| १० - २० - ५९ - ८३ | ४२ - ५२ - ६१ - ९१ |
| १६ - २६ - ५३ - ८९ | ४८ - ५८ - ६७ - ९७ |
| १७ - २७ - ५४ - ८४ | ४४ - ५० - ६३ - ९३ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस १७ डिसें. २०२५

### बुधवार दि. १७ डिसेंबर २०२५

**सर्व बाजार साठी**

३९ - ६९ - ७२ - ०२
३५ - ६५ - ७८ - ०४
३१ - ६१ - ७४ - ०८

१५७ - १६९ - १७९ - १९०
४९० - ३४९ - ३५९ - ४६०
३४६ - २५९ - २७८ - २२६

**सर्व बाजारासाठी**

| सोम. ते बुध. ओपन डे | | | | | | सोम. ते बुध. ओपन नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३९ | | ६०० | | ३७० | | २८८ | | १७९ | | ६९० | |
| २३८ | ३ | ५५६ | ६ | ४६० | ० | ३५० | ८ | २७८ | ७ | ५०० | ५ |
| ३३७ | | २४० | | ५५० | | १३४ | | ३७७ | | ७८० | |

| सोम. ते बुध. क्लोज डे | | | | | | सोम. ते बुध. क्लोज नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४४६ | | १५९ | | ११४ | | १३८ | | १७० | | १२६ | |
| ६९९ | ४ | २५८ | ५ | २७७ | ६ | ३४५ | २ | ३७८ | ८ | २८९ | ९ |
| २६६ | | ३५७ | | ३३० | | ४८० | | २३३ | | ३६० | |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

४ ६ ८ ५ ७

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## राशीभविष्य

**मेष :** आज एखादे महत्त्वाचे काम पूर्ण करण्यात येणारे अडथळे दूर होतील. तुम्ही एखाद्या मित्राला मदत कराल जे भविष्यात तुमच्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. कामाच्या ठिकाणी वरिष्ठांकडून तुम्हाला आदर मिळू शकेल.

**वृषभ :** आज नशीब तुमच्या बाजूने असेल. इतरांशी बोलणे आणि व्यवसायात सल्ला घेणे फायदेशीर ठरू शकते. आज आर्थिक परिस्थिती अनुकूल असेल. अविवाहितांसाठी आजचा दिवस खूप चांगला आहे.

**मिथुन :** जर तुम्ही अलीकडेच एखादा प्रकल्प सुरू केला असेल तर आज त्याचे सकारात्मक परिणाम मिळतील. जास्त कामामुळे तुम्हाला थकवा जाणवू शकतो. प्रकृतीकडे लुक्ष पुरवा.

**कर्क :** आज तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत वेळ घालवाल. तुम्ही सहलीची योजना देखील आखू शकता. यामुळे कुटुंबात आनंद आणि शांती वाढेल. तुमच्या गोड भाषेने इतरांना तुमचे काम करून देण्यात यशस्वी व्हाल.

**सिंह :** आज तुम्ही इतरांना मदत करण्यास तयार असाल. त्यांचे आशीर्वाद संध्याकाळपर्यंत तुमच्या मनावर नक्कीच परिणाम करतील. आज कामाच्या ठिकाणी काही नवीन जबाबदाजया मिळू शकतात.

**कन्या :** भूतकाळ विसरून तुम्ही नवीन गोष्टींवर लक्ष केंद्रित करा. उगाच जुन्हा गोष्टी उगाळूनका, त्रास होईल. आज तुमच्या व्यस्त आयुष्यातून वेळ काढून तुमच्या कुटुंबासोबत थोडा वेळ घालवल्याने आनंद मिळेल.

**तुळ :** आर्किटेक्टसाठी आजचा दिवस प्रगतीचा असेल. शेतकजयांना आज काही फायदे मिळू शकतात. त्यांना त्यांच्या पिकांच्या विक्रीसाठी जमीनदाराकडून इच्छित रक्कम मिळू शकते.

**वृश्चिक :** तुम्ही ज्या संधीची वाट पाहत आहात ती आज प्रत्यक्षात येईल. ते महत्वाचं काम पूर्ण होणार. ऑफिसमधील प्रलंबित कामे तुमच्या वरिष्ठांच्या मदतीने पूर्ण होतील. तुम्हाला पदोन्नती देखील मिळू शकते.


**धनु :** उच्च शिक्षणासाठी बाहेर जाऊ इच्छिणाजया विद्यार्थ्यांसाठी हा काळ अनुकूल आहे, गुड न्यूज मिळेल. आज तुम्हाला तुमच्या धाकट्या भावाकडून चांगली बातमी मिळेल.

**मकर :** आज तुम्ही तुमची सर्व प्रलंबित कामे आत्मविश्वासाने पूर्ण कराल. कोणत्याही तुम्हाला सामाजिक किंवा धार्मिक कार्यात रस असेल. सभोवतालच्या लोकांशी सामंजस्याने वागा.

**कुंभ :** कुटुंबात आनंदाचे वातावरण असेल. तुमच्या जोडीदारासोबतचे झालेला वादमिटवा, घरात शांतता नांदेल. आज, तुम्ही एखाद्या कामाबद्दल उत्साही असाल आणि ते काम सहज आणि वेळेवर पूर्ण होईल.

**मीन :** तुमचा एखाद्या राजकारण्याशी संपर्क येईल. तुमच्या योजनांमध्ये सहभागी होण्यासाठी तुम्हाला इतर सहयोगींची आवश्यकता असू शकते. बिझी शेड्युलमुळे तुमच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.

## शब्दकोडे क्रमांक २३००



**आडवे शब्द :-**


१) प्रतिनिधी निवडण्याची क्रिया
४) माणूसघाणा, तुसडा
९) प्रहार
१०) दुर्दशा
१२) पृथ्वी
१३) दुर्योधनाचा जिवलग मित्र
१४) पोस्ट ऑफिस
१७) मनाचा ओढा
१८) यजमान, नवरा
१९) उदा. हिंदू, धर्म, ख्रिश्चन इत्यादी
२०) खळबळजनक
२१) च्या मार्गाने जाणे
२५) न्याय, तक्रार
२६) परमेश्वर
२७) अलमारी
२९) लेखणी
३०) पोते
३३) पदार्थाचा सूक्ष्म भाग
३४) सुळा
३६) झीज, नुकसान
३७) कमळाचे तळे, श्रीविष्णूचे एक नाव
४०) नाश पावणारे
४२) धमनी
४३) अखबार
४६) बाळाचा पाण्याचा शब्द
४८) प्रकृती
४९) कुंपणापर्यंत धाव असलेला प्राणी
५१) खूप वाढलेला व्याप
५३) विंचवाचा दंश करण्याचा अवयव
५४) केस कापणे
५६) आवड
५७) धान्य पिकवणारी जमीन
५८) उष्ण
६०) करवून घेणारा (परमेश्वर)
६२) पंख
६३) गाजावाजा
६६) संरक्षणाची भिंत
६७) भाजपाचा बिहारमधील खासदार असलेला अभिनेता
६८) मीठ जास्त झाल्यानंतरची चव

**उभे शब्द**

१) निकाल, निर्णय
२) श्रेष्ठ प्रतीचा
३) बशीबरोबरचे साधन
४) आश्चर्य
५) नवऱ्याच्या प्रेताबरोबर जाळून घेणारी स्त्री
६) कोवळ्या दुधाचा पदार्थ
७) व्रत
८) रंग
११) एखाद्या कामात अनेक अडथळे या अर्थाची म्हण
१३) नशीब, काम
१५) निबीड, दाट
१६) सैन्याचा दाणागोटा
१८) तीरकमान
१९) कोथिंबीरीचे बीज
२२) रसाळ
२३) सुनील *****, विक्रमवीर भारतीय क्रिकेटपटू
२४) छिद्र, बीळ
२८) बदल
३१) मोठी नदी
३२) श्वसनेंद्रिय
३३) लाकूड कापण्याचे हत्यार
३५) आकाशातील विशिष्ट चांदण्या
३६) पेशवेकालीन स्त्रियांचा अंबाड्याचा एक प्रकार
३८) अंत:करण
३९) तमाशातील कलाकार
४१) समतल
४४) पुरूष
४५) जहाजांचे बंदरावर थांबणे
४७) पातक
५०) अवधान, चित्त
५१) काडीमोड
५२) उथळ आकार
५३) हल, शेतीतील एक अवजार
५५) बाज
५९) सुसर
६१) खेळण्याचे पत्ते (हिंदी)
६२) कापडाची रुंदी
६४) समाजातील वजन, प्रतिष्ठा
५३) सतत वाहणारी हवा.

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# तहसील कार्यालयातून चोरलेला ट्रक गुन्हे शाखेकडून जप्त

## अवैध वाळू तस्करीचा धागा उघड ◆ चालक अटकेत

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 16)**- शहरात अवैध वाळू तस्करी प्रकरणाला गंभीर वळण मिळाले असून, तहसील कार्यालयातून चोरून नेण्यात आलेला तब्बल 18 लाख रुपयांचा ट्रक गुन्हे शाखेने शोधून काढत चालकाला अटक केली आहे. ही कारवाई 16 डिसेंबर रोजी करण्यात आली.

गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळू तस्करीतून जप्त करण्यात आलेला ट्रक तहसील कार्यालयाच्या पार्किंगमधून चोरून नेल्याप्रकरणी गुन्हे शाखा, अमरावती शहरने मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणात ट्रकचालक सुनील लक्ष्मणराव भांबूरकर (रा. वलगाव, अमरावती) याला अटक करण्यात आली असून, आरोपींकडून अंदाजे 18 लाख रुपये किमतीचा ट्रक जप्त करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, 11 डिसेंबर रोजी एका महिला महसूल अधिकाऱ्याने गाडगेनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. एमएच 40/वाय 3193 क्रमांकाचा ट्रक रॉयल्टी न भरता अवैधरित्या वाळूची वाहतूक करताना पकडण्यात आला होता. कायदेशीर कारवाईसाठी हा ट्रक तहसील कार्यालयाच्या आवारात उभा करण्यात आला होता. मात्र, ट्रक मालक गजानन काळपांडे याने सदर ट्रक तहसील कार्यालयाच्या पार्किंगमधून चोरून नेल्याचे उघडकीस आले.

या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू असताना गुन्हे शाखेला गुप्त माहिती मिळाली की, चोरीचा ट्रक नांदगाव पेठ परिसरातील रेवा हॉटेलजवळील युनिव्हर्सल मोटर्स येथे उभा आहे. माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी धाड टाकून तो ट्रक ताब्यात घेतला.तपासादरम्यान हा ट्रक चालक सुनील भांबूरकर याने तेथे आणल्याचे निष्पन्न झाले. चौकशीत त्याने ट्रक मालक गजानन काळपांडे यांच्या सूचनेवरून तहसील कार्यालयातून वाहन आणल्याची कबुली दिली. जप्त ट्रकची अंदाजे किंमत 18 लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

अटक करण्यात आलेल्या ट्रकचालक सुनील भांबूरकर याला पुढील कारवाईसाठी गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, सतीश देशमुख, फिरोज खान, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, नाझीमोदीन सय्यद, रणजित गावंडे तसेच चालक अमलदार प्रभात पोकडे यांनी केली.

# जिल्ह्याच्या विकासासाठी पायाभूत सुविधा उभाराव्यात- जिल्हाधिकारी आशिष येरेकर

## जिल्ह्यातील पर्यटन वाढविण्यावर भर

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 16)** - जिल्ह्यात चिखलदरा हे महत्वाचे पर्यटनस्थळ आहे. प्रामुख्याने नैसर्गिक आणि वन्य प्राणी पाहण्यासाठी जंगल सफारी हे प्रमुख आकर्षण आहे. त्यामुळे याठिकाणी विकासात्मक पायाभूत सुविधा उभाराव्यात, तसेच येथे येणाऱ्या पर्यटकांच्या करमणुकीसाठी साधने उभारल्यास पर्यटक मुक्कामासाठी थांबण्यास मदत होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.



जिल्हाधिकारी कार्यालयात आज पायाभूत सुविधा आणि चिखलदरा पर्यटनाबाबत आढावा घेण्यात आला. यात चिखलदरा येथील पर्यटन वाढविण्याच्या दृष्टीने विविध विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती घेण्यात आली.

चिखलदरा येथे सिडकोमार्फत स्कायवॉक उभारण्यात येत आहे. स्कायवॉक उभारणीत अडचणी आल्याने काम पूर्ण करण्यासाठी स्कायवॉकच्या मध्यभागी जमिनीतून आधार देणे आवश्यक आहे. यासाठी तात्पुरता पाया उभारण्यात येणार आहे. गोल रस्त्याचे काम करण्यात येणार असून यात वन विभागाच्या जागेवर तोडगा काढण्यात येणार आहे. याठिकाणी निसर्ग पर्यटनासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी सादरीकरण करण्यात आले. चिखलदरा येथेच साहसी खेळाची अकॅडमी उभारण्यात येणार आहे. यासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे. तसेच कोलकास येथे कोरकू यांच्या जीवनावर आधारीत केंद्र उभारण्यात येणार आहे.

चिखलदरा येथे येणारा पर्यटक याठिकाणी थांबावा, यासाठी लाईट इफेक्ट गार्डनची सूचना करण्यात आली. मात्र याठिकाणी वन्य प्राण्यांचा वावर असल्याने ही बाब तपासण्याच्या सूचना देण्यात आल्या. गाविलगड किल्ल्याचा विकास पुरातत्व विभागाच्या सल्ल्यानुसार करावा. आमझरी हे मधाचे गाव म्हणून विकसित करण्यात येत आहे. त्यामुळे येथे प्रशिक्षण आणि इतर सुविधा उभारण्यात याव्यात. यासोबतच मेळघाटातील 22 गावांमध्ये वीज पोहोचण्यासाठी वनविभागाच्या सर्व परवानगी घ्यावी. पीएम मित्रा पार्कमध्ये विज उपकेंद्रासाठी जागा मिळणार आहे. त्यानुसार नियोजन करण्यात येणार आहे. मोर्शी आणि वरूड भागासाठी संत्रा प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यात यावी. याठिकाणी कार्यरत जैन आणि एमकेसी यांच्यासोबत समन्वय राखण्यात येणार आहे.

# महावितरणच्या 31 अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

महासागर प्रतिनिधी

**अमरावती,(दि.16)** - वीजबिल वसुलीत सातत्याने अपयशी ठरल्याप्रकरणी महावितरणच्या अमरावती परिमंडळातील 31 अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात आली आहे. नोव्हेंबर महिन्याची डिमांड वसूल करण्यात निष्काळजीपणा केल्याबद्दल पाच अधिकाऱ्यांच्या पगारातून एक तृतियांश रक्कम कपात करण्यात आली असून 26 क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. वीजबिल वसुली हीच महावितरणच्या अस्तित्वाची आधारशिला असल्याचे स्पष्ट करत मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी वसुली व वीजसेवेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत. जबाबदारीतील हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. ऑक्टोबर 2025 अखेर

## वीज बिल वसुलीत अपयश

## 5 अधिकाऱ्यांच्या पगारातून कपात

अमरावती परिमंडळातील लघुदाब वर्गवारीतील घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, पाणीपुरवठा योजना, पथदिवे व इतर ग्राहकांकडे एकूण 906 कोटी रुपयांची थकबाकी होती.

# न.प.च्या निवडणुकीसाठी शाळांना दोन दिवस सुट्टी जाहीर

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, दि. 16 :** नगरपरिषद, नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक-2025 करिता दि. 20 डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे मतदान केंद्र असणाऱ्या नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रातील शाळा आणि महाविद्यालयांना दि. 19 आणि 20 डिसेंबर रोजी दोन दिवसांची सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.


जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी, अचलपूर, वरुड, दर्यापूर, आणि धारणी येथील नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीसाठी मतदान केंद्रावर नियुक्त केलेले मतदान अधिकारी, कर्मचारी मतदान साहित्य घेऊन केंद्राचा ताबा घेणार असल्याने दोन दिवसांची सुट्टी असणार आहे, असे आदेश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जारी केले आहे.

# राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धाचे आयोजन

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 16)**- जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे 17 व 19 वर्ष मुले व मुलींची राज्यस्तरीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धा सन 2025-26 चे आयोजन दि. 17 ते 20 डिसेंबर या कालावधीत करण्यात आले आहे. गुरूवार, दि. 18 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 10 वाजता स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे.

जिल्हा क्रीडा संकुलाच्या खेलो इंडिया आर्चरी आंतरराष्ट्रीय रेंजवर स्पर्धा होणार आहे. राज्यातील 8 महसूल विभाग आणि 1 क्रीडा प्रबोधिनी, पुणे अशा एकूण 9 विभागांतील 17 व 19 वर्षांखालील मुले व मुली यात सहभागी होणार आहेत. स्पर्धेसाठी सुमारे 485 खेळाडू, संघव्यवस्थापक, प्रशिक्षक आणि निवड समिती सदस्य उपस्थित राहणार आहेत.



उद्घाटक कार्यक्रमाला जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, राज्य ऑलिम्पीक संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, राज्य धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रमोद चांदूरकर उपस्थित राहतील. उद्घाटन समारंभात आर्चरी खेळातील आंतरराष्ट्रीय खेळाडू तुषार शेळके, मानव जाधव, कुमकुम मोहोड, यशदिप भोगे, मधुरा धामणगांवकर, पुर्वशा शेंडे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. निवड समिती इंडियन, कंपाऊंड व रिकर्व्ह या क्रीडा प्रकाराचे निरीक्षण करून महाराष्ट्र राज्याच्या 17 व 19 वर्ष मुले व मुलींच्या संघाची निवड करतील. महाराष्ट्र राज्याचा संघ दि. 20 डिसेंबर रोजी सायंकाळी घोषित करण्यात येणार आहे. निवड झालेल्या संघातील खेळाडू झारखंड व मणिपूर येथे होणाऱ्या 69व्या राष्ट्रीय शालेय धनुर्विद्या क्रीडा स्पर्धेत प्रतिनिधित्व करतील. प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या खेळाडूंना आकर्षक मेडल्स व प्राविण्य प्रमाणपत्रे. तसेच सर्व सहभागी खेळाडूंना स्पर्धा सहभाग प्रमाणपत्रे वितरीत करण्यात येणार आहे.

# वरुडमध्ये तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे दिमाखदार उद्घाटन

महासागर प्रतिनिधी

**वरुड, (दि.16)**- तालुक्यातील विज्ञानप्रेमी विद्यार्थी व शिक्षकांसाठी महत्त्वाचा ठरणारा 53 वा तालुका स्तरीय विज्ञान महोत्सव उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वरुड येथे उत्साहात सुरू झाला. शिक्षण विभाग, पंचायत समिती वरुड, तालुका मुख्याध्यापक संघ तसेच गणित व विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.



प्रदर्शनाचे उद्घाटन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. अमरावती प्रिया देशमुख यांच्या हस्ते डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करून दीपप्रज्वलनाने झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी खुशाल पिल्लारे होते. यावेळी उपशिक्षणाधिकारी निखिल मानकर, पोलीस निरीक्षक अर्जुन ठोसरे, गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सुरुवातीला ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. विज्ञान अध्यापक मंडळाच्या अध्यक्षा नंदिनी ठाकरे यांनी प्रास्ताविकातून आयोजनाचा आढावा घेतला. या दोन दिवसीय प्रदर्शनात तालुक्यातील 67 शाळांचा सहभाग असून विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक मॉडेल्स, प्रयोग व नवकल्पना सादर केल्या. उद्घाटनप्रसंगी श्रीमती प्रिया देशमुख यांनी विज्ञान शिक्षणाच्या प्रयोगात्मक दृष्टिकोनावर भर दिला.

कार्यक्रमाचे संचालन रिजवान अहमद खान व कविता पाटील यांनी केले, तर आभार तसनीम फिरदौस यांनी मानले. विज्ञानातील कल्पकतेचे दर्शन घडवणारे हे प्रदर्शन तालुक्याचा अभिमान वाढवणारे ठरले.

# हल्लीच्या तरुणाईची लव्ह मॅरेजला वाढती पसंती

## झपाट्याने बदलते सामाजिक वास्तव; प्रेमविवाहांचे प्रमाण दुप्पट ◆ मोबाईल ठरतोय बदलाचा सर्वात मोठा टर्निंग पॉइंट

नितीन दुर्बूडे

**पथ्रोट, (दि. 16)** - जिल्ह्यासह राज्यातील ग्रामीण व शहरी भागात सध्या प्रेमविवाहांची (लव्ह मॅरेज) संख्या झपाट्याने वाढत असून, हे बदलते सामाजिक वास्तव अधोरेखित करत आहे. एकेकाळी समाजात बंडखोरी, कुटुंबावरील कलंक मानले जाणारे प्रेमविवाह आता हळूहळू स्वीकारले जाऊ लागले आहेत. अनेक गावांमध्ये गेल्या काही वर्षांत अशा विवाहांचे प्रमाण दुपटीपेक्षा अधिक वाढल्याचे सामाजिक जाणकार सांगतात.

ग्रामीण युवक-युवती शिक्षणासाठी शहरांकडे जात असल्याने त्यांना खुले वातावरण मिळत आहे. मोबाईल फोन, सोशल मीडिया आणि वाढलेला संवाद यामुळे नातेसंबंध जुळण्याचे प्रमाण वाढले आहे.

मोबाईल हा या सामाजिक बदलाचा सर्वात मोठा टर्निंग पॉइंट ठरत आहे. विविध जाती-धर्मांतील तरुण प्रेमविवाह करत असल्याने सामाजिक भेदभाव व जुनाट परंपरांची पकड सैल होत आहे.




### बदलामागील दुष्परिणाम

- मोबाईलमुळे चुकीच्या नात्यांत अडकणारे तरुण
- अल्पवयीनांचे पळून जाण्याचे वाढते प्रकार
- तडकाफडकी विवाह निर्णय
- आर्थिक स्थैर्य नसताना घेतलेले निर्णय

**या कारणांमुळे अनेक कुटुंबांमध्ये तणाव, दुरावा, कोर्टकचेऱ्या व पोलिस ठाण्यांची पायरी चढण्याची वेळ येत आहे.**

### अनुभवाची साक्ष

आर्य समाज, पथ्रोट येथे विवाहबद्ध झालेल्या एका युवकाने संघर्षानंतर आज संसार स्थिर असल्याचे सांगत संवादातून नाती पुन्हा जुळल्याचे नमूद केले. ग्रामीण भागातील वाढती लव्ह मॅरेज संस्कृती ही केवळ विवाहपद्धतीतील बदल नसून, समाजाच्या मानसिकतेतील परिवर्तन आणि समानतेकडे वाटचाल दर्शविणारा महत्त्वाचा सामाजिक टप्पा ठरत आहे.

### पोलिस ठाण्यात दरमहा येणारी जोडपी

पोलिस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, दरमहा सरासरी 10 ते 12 प्रेमविवाह करणारी जोडपी पोलिस ठाण्यात दाखल होतात. 18 ते 21 वयोगटातील युवक-युवतींचे प्रमाण अधिक आहे. समुपदेशन कक्षामार्फत जोडपी व त्यांच्या पालकांना समजावून सांगण्यात येते. मात्र उथळ प्रेम किंवा सोशल मीडियाच्या प्रभावाखाली घेतलेले निर्णय अनेकदा अल्पकाळात अपयशी ठरतात, असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### आर्य समाजाचा अनुभव

आर्य समाजाचे कार्यकर्ते शरद कोसरे सांगतात, मुलींच्या पालकांच्या वाढत्या अपेक्षांमुळे अनेक मुलांची लग्ने रखडली आहेत. त्यामुळे आजची तरुणाई प्रेमविवाहाकडे वळत आहे.


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे गणेश दादाराव काजलकर यांचे वतीने सादर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

मिळकतीचे वर्णन : मौजे अकोली, प्रगणे बडनेरा, प्लॉट क्रं. L-90, Amravati Housing & Area Development Board, Amravati. शेत सर्वे क्रं. 6/2, म्हाडा कॉलनी, ता. आणि जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे गणेश दादाराव काजलकर. यांच्या मालकीचे आहे. तदनंतर, त्यांनी PNB HOUSING FINANCE LIMITED BR. AMRAVATI (Roshani) येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ दस्त 1) दि. 05/07/2017 रोजीचे दस्त क्र. 1367, 2) दि. 25/06/2019 रोजीचे दस्त क्र. 2206 मधील पान क्रं. 11 आणि 12 तसेच अलोटमेंट लेटर दि. 19/01/1996 ओर्डर क्र. 3444 (म्हाडा) सदर दोन्ही मूळ दस्त आणि अलोटमेंट लेटर गहाळ झालेले आहे. तसेच सदर दस्त कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान, पतसंस्था / राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही हि विनंती.

शिक्का

आपला
Advocate
रवींद्र र वाटाणे
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो. नं. 9823698745

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे विशाल त्र्यंबकराव घोरमाडे यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

**मिळकतीचे वर्णन:** मौजे चांदूर बाजार, प्रगणे करजगाव, सर्वे क्रं. 83/2, प्लॉट क्रं. 21 पैकी, ता. आणि जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे विशाल त्र्यंबकराव घोरमाडे हे रणजीत विश्नुपंथ इंगळे यांच्या कडून विकत घेण्याचा सौदा झालेला आहे. तदनंतर, विशाल त्र्यंबकराव घोरमाडे यांनी VASTU HOUSING FINANCE CORPORATION LTD येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, सदर मिळकतीचे मूळ खरेदी खत दि. 10/03/1995 रोजीचे दस्त क्र. 597 हे मुळ खरेदी खत गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान, पतसंस्था / राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 3 दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही हि विनंती.

शिक्का

आपला
Advocate
रवींद्र र वाटाणे
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो. नं. 9823698745

## जाहिरनामा / सायटेशन

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि. श्री. एस.बी.कळदाते 2 रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज कमांक - 2765/2025
नथुजी व इतर विरूध्द निरंक
पुढील तारीख 06.01.2026

अर्जदार :- Natthuji Ganpatrao Pachghare
Age-74 yrs Occ- Agriculturist,
R/o Borgaon Dharmale Tq Dist Amravati

**विरुध्द**

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत मारोतराव बहिरामजी पाचधरे दि 16.09.1997 रोजी अमरावती येथे मयत झाले अर्जदार नथुजी विरुध्द निरक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सबहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याचाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF v}w| FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा अर्जदार नथुजी विरूध्द निरक वरीलप्रमाणे सदहुँ मयताचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सबहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सवहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. 06.12.2025 रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर अमरावती

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी व माझे पक्षकार नामे 'श्री. विनोद जयराम चौबे' यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन - मौजे- धामणगाव (दत्तापूर), प्रगणे तळेगाव द, प्लॉट क्रं. 10, शेत सर्वे क्रं. 79/1ए, नझुल सिटी क्रं. 1/12, शित क्रं. 31, पुण्यनगरी लेआऊट, ता. धामणगाव रेल्वे, जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार 'श्री. विनोद जयराम चौबे' यांच्या खरेदी हक्काने मालकीचे आहे. तसेच वरील वर्णनाचे मूळ खरेदीखत दि. 11/09/2012 रोजीचे दस्त क्रं. 2178 सदर दस्त गहाळ झालेले आहे. तसेच वरील नमूद दस्त कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी//पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमतेवीषयी शासकीय-नीमशासकीय-इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली देलेल्या माझ्या मोबाइल क्रं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
Advocate
रवींद्र र वाटाणे
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो. नं. 9823698745

## जाहीर नोटीस

**मार्फत** :- 1. सौ. पद्मा अनिल डिडोळकर, 2. सौ. मेघा अरूण जातेगावकर, 3. सौ. शुभांगी दिलीप वकील, 4. सौ. सुनंदा संजय हरीदास, 5. सौ. सिमा सुनिल भोळे क्र. 1 ते 5 द्वारा :- सौ. पद्मा अनिल डिडोळकर, द्वारा - श्री अशोक झाडे, नगर परिषद ले आऊट, बस स्टॅण्ड मागे, देवळी, जि. वर्धा 442 101.

**प्रति,**
**श्री कुशल चौधरी, चैतन्य कॉम्प्लेक्स, डी. पी. रोड,**
**अंजनगाव-सुर्जी, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती.**

महोदय,

आपण दिनांक 02/12/2025 रोजीच्या महासागर, अमरावती या दैनिकातील पान क्र.6 वर आपल्या सहीनिशी प्रसिध्द झालेल्या जाहीर नोटीसचे अनुषंगाने आपल्यास ही लेखी हरकत देण्यात येते की, परतवाडा येथील बारलिंगे प्लॉट ह्या नावे ओळखल्या जाणाऱ्या व नझुल शिट क्र. 9, प्लॉट क्र. 11/2, एकुन क्षेत्रफळ 9280.80 चौ. मि. जागा व त्यावर असलेल्या संपुर्ण बांधकामासहीत व राहत्या घरासहीत ही मालमत्ता मुलत: श्री शंकरराव बारलिंगे ह्यांच्या मालकीची होती. श्री शंकरराव यांना चार मुली व एक मुलगा मधुसुदन आहे. तसेच मधुसुदन बारलिंगे ह्यांनासुध्दा पाच मुली व एक मुलगा (मयत दत्तपियुष) आहे. श्री मधुसुदन यांना येणाऱ्या वर उल्लेखित मालमत्तेमधील हिश्श्यात त्यांच्या पाच मुली व मयत दत्तपियुष यांची विधवा श्रीमती शुभदा यांचा समसमान / अविभाजित हिरसा आहे.

वरील परिस्थिती पाहता, श्रीमती शुभदा दत्तपियुष बारलिंगे यांना एकटीला सदर वर उल्लेखित मालमत्तेसंबंधी कोणत्याही प्रकारे सौदा करण्याचा कोणताही कायदेशीर हक्क नाही. याशिवाय आपणांस कळविण्यात येते की, सदर मालमत्तेसंबंधी वि. दिवाणी न्यायाधिश (वरीष्ठ स्तर), अचलपूर यांचे न्यायालयात विशेष दिवाणी दावा क्र.01/2020 (शुभदा - वि- पद्मा व इतर) प्रलंबित असून त्यामध्ये वि. न्यायालयाने श्रीमती शुभदा बारलिंगे यांनी सदर मालमत्तेमध्ये कोणत्याही प्रकारे तुतीयपक्षीय हक्क निर्माण करू नये असा नुकताच आदेश पारित केलेला आहे.

तरी आपणांस कळविण्यात येते की, वरील मालमत्तेसंबंधी आपण कोणत्याही प्रकारे व कोणत्याही करारपत्राच्या आधारे हस्तक्षेप करू नये. असे काही केल्यास असा कोणताही व्यवहार गैरकायदेशीर ठरेल व आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि. 15/12/2025

शिक्का

सौ. पद्मा अनिल डिडोळकर
स्वत: करीता आणि
सौ. मेघा अरूण जातेगावकर, सौ. शुभांगी दिलीप वकील,
सौ. सुनंदा संजय हरीदास, सौ. सिमा सुनिल भोळे यांचे वतीने
सर्व द्वारा सौ. पद्मा अनिल डिडोळकर,
द्वारा - श्री अशोक झाडे, नगर परिषद ले आऊट,
बस स्टॅण्ड मागे, देवळी, जि. वर्धा 442 101


RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# त्यासाठीच तर दादांचे 'एकला चलो'

## विजय वडेट्टीवार यांचा हल्लाबोल



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि.१६ :
राज्यात महापालिका निवडणुकांची घोषणा झाली. या निवडणुकांमध्ये भाजप आणि शिंदे यांची युती असणार पण अजित पवारांचा पक्ष नसणार, हा महायुतीचा डाव आहे. सत्तेचा मलिदा खाताना अजित पवारांचा पक्ष चालतो पण निवडणुकीत काँग्रेसच्या सेक्युलर मतांचे विभाजन करण्यासाठी अजित पवार यांचा पक्ष स्वतंत्र निवडणूक लढवणार महायुतीची ही रणनीती आहे. हे जनतेला समजते अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

माध्यमांशी बोलताना वडेट्टीवार यांनी महायुतीवर सडकून टीका केली. हसन मुश्रीफ यांना कॅबिनेट मंत्री करायचे त्यांच्याबरोबर चहा नाश्ता करायचा आणि निवडणूक आली की नवाब मलिक यांचा मुद्दा पुढे करून युतीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाला दूर ठेवायचे हा दुटप्पीपणा आहे.

निवडणुकीत हिंदुत्वाच्या मुद्दा पुढे करत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाला जवळ करायचे आणि मतांचे विभाजन करण्यासाठी अजित पवार यांना स्वतंत्र निवडणूक लढवायला लावायची, महायुतीचे हे राजकारण लपून राहिलेले नाही. हिंदू विरुद्ध मुस्लिम केल्याशिवाय भाजप निवडणुका जिंकू शकत नाही म्हणून निवडणुका आल्या की हा वाद निर्माण केला जातो अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसींना २७ टक्के आरक्षण दिले अस भाजप सांगत होती. आता महापालिकेच्या निवडणुका घोषित झाल्या आहेत. पण उद्या कोर्टात जाऊन पुन्हा ओबीसींच्या जागांवरील निवडणुका रद्द झाल्या, त्यांचे प्रतिनिधित्व कमी झाले तर ही जबाबदारी कुणाची? निवडणुका झाल्या तरी ओबीसींवर टांगती तलवार आहे त्यांच्या जागांवर वरवंटा फिरणार आहे, अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

# शैक्षणिक प्रतिज्ञापत्राचे मुद्रांक शुल्क माफ

## शासनाचा मोठा निर्णय : आर्थिक ताण कमी होणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :
गेल्या वर्षी १६ ऑक्टोबरपासून मुद्रांक शुल्कात वाढ करण्याचा निर्णय सरकारकडून घेण्यात आला. यानुसार, सर्व व्यवहारांसाठी भराव्या लागणाऱ्या मुद्रांक शुल्काची रक्कम किमान १०० वा २०० पासून थेट ५०० रुपये करण्यात आली. त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांवरदेखील झाला. विद्यार्थ्यांना लागणाऱ्या वेगवेगळ्या प्रमाणपत्रांसाठी मुद्रांक शुल्क भरावे लागते.

प्रवेश घेताना, परीक्षा अर्ज भरताना किंवा इतर कोणत्याही प्रमाणपत्राची मागणी करताना विद्यार्थ्यांना ही स्टॅम्प ड्युटी भरावी लागत होती. आता त्यातून विद्यार्थ्यांची सुटका होणार आहे.

शैक्षणिक कामकाजासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावे लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्यभरातील लाखो विद्यार्थ्यांसह कोट्यवधी नागरिकांना या निर्णयाचा



दिलासा मिळाला असून विद्यार्थी आणि पालकांवरील आर्थिक ताण आता कमी होणार आहे.

या निर्णयाबाबत माहिती देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माहिती दिली. ह्यकुठल्याही शैक्षणिक कामासाठी जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रीमिलेयर अथवा राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र तसेच शिक्षणाकरिता महसूल विभागाकडून जी प्रमाणपत्र लागतील त्याला कुठलेही मुद्रांक शुल्क लागणार नाही. हा निर्णय विद्यार्थी आणि पालकांसाठी महत्त्वपूर्ण आहे. या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येईल.

साधारणतः दहावी बारावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर हे दाखले मिळवावे लागतात. यासाठी पालकवर्ग तहसील कार्यालयात जाऊन दाखले मिळवतात. प्रत्येक दाखल्यासाठी ५०० रुपये याप्रमाणे सुमारे तीन हजार रुपये यासाठी पालक खर्ची घालतात.

नव्या निर्णयामुळे पालकांचा हा आर्थिक भुर्दंड वाचणार आहे. साध्या कागदावर अर्ज लिहून तो सेतू कार्यालयामार्फत तहसील कार्यालयात द्यावा लागेल. त्यानंतर लागलीच दाखले मिळतील.

# तिच्या डॉक्टर होण्याच्या स्वप्नांचा चुराडा...

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. १६ :
डॉक्टर होण्याच्या निधारने तिने बारावीमध्ये अभ्यासावर प्रचंड मेहनत घेतली. वडिलांनी देखील लाडक्या लेकीच्या शिक्षणासाठी कोणतीच कमी पडू दिली नाही. त्यांचे परिश्रम, निर्धार यशस्वी होऊन तिला बुलढाण्यातील एका आयुर्वेद महाविद्यालयात प्रवेश मिळाला आणि तिचं वैद्यकीय शिक्षण देखील सुरु झाले.



मात्र, पिता माता व पुत्रीच्या डॉक्टर होण्याच्या स्वप्नावर मंगळवारी काळाने घाला घातला. एका अपघातात त्या युवतीचा मृत्यू झाला. यामुळे काही क्षणात होत्याचे नव्हते झाले. ऋतुजा गणेश सावळे (वय १९), रा. डोंगरशेवली, तालुका चिखली, जिल्हा बुलढाणा असे मृत युवतीचे नाव आहे.

ती बुलढाणा येथील राजश्री शाहू महाराज आयुर्वेद महाविद्यालयात प्रथम वषार्ची विद्यार्थिनी होती. मंगळवारी नेहमीप्रमाणे महाविद्यालयात दुचाकीने जात असताना तिचा अपघात झाला. त्यावेळी बसच्या बाजूला ती गाडी चालवत होती.

समोर जात असतांना विरुद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकीने ऋतूजाला धडक दिली. या धडकेमुळे एका बाजूला जाण्याच्या प्रयत्नात तिचे डोके एसटी बसला धडकले. यामध्ये ती खाली कोसळली आणी गंभीर जखमी झाली. तिला जिल्हा सामान्य रूग्णालय बुलढाणा येथे दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर ऋतूजाला मृत घोषित केले.

आईवडीलांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न साकर करण्यासाठी ऋतूजा सावळे हीने प्रचंड मेहनत घेतली. तिच्या वडीलांनी सुध्दा तिला डॉक्टर बनविण्यासाठी खुप प्रयत्न केले. डॉक्टर व्हावी यासाठी ऋतुजाला परदेशात सुध्दा पाठविण्याची तयारी गणेश सावळे यांची होती. आपली कन्या शिकून मोठी डॉक्टर होणार या आनंदाने सावळे परिवार हरखून गेला. मात्र नियतीच्या मनात काही वेगळेच होते. आज ऋतुजा कॉलेजसाठी निघाली पण गावापासून काही अंतरावर जात नाही तर तिच्यावर काळाने घाला घातला.

# विधानभवनाच्या शेजारी पकडला गांजा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :
विधिमंडळ हिवाळी अधिवेशन संपून दोनही दिवस होत नाहीत तोच विधानभवनाच्या अगदी शेजारी अंमली पदार्थ विरोधी पथकाने मंगळवारी दोन किलो ग्रांजासह दोन तस्करांना अटक केली. या दोघांना गांजा पुरवणारे आणखी दोन तस्कर फरार झाले आहेत. विधानभवनाला लागून असलेल्या मरिअम झोपडपट्टीत पोलिसांनी ही कारवाई केली.



धक्कादायक बाब म्हणजे अधिवेशनासाठी विधिमंडळाच्या परिसरात तगडा फौजफाटा तैनात असतानाही हा गांजा खुले आम विकला जात होता, असाही पोलिसांना संशय आहे.

विधानभवनाच्या भिंतीला लागून असलेल्या मिठानिम दर्गाहच्या समोरील मरिअम झोपडपट्टीत किरकोळ गांजा विक्री केली जात असल्याचा सुगावा पोलिसांना लागला होता. अंमली पदार्थ विरोधी पथकाने बुधवारी दुपारी १२ च्या सुमारास शोध मोहीम राबवत श्वान पथकाला पाचारण केले. झोपडपट्टीतल्या एका घरातलपवून ठेवलेला दोन किलोग्रॅम गांजा गांजा पथकाच्या हाती लागला.

अधिवेशन काळात या ठिकाणी पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात होता राज्याचे मंत्री आणि मंत्रिमंडळ याच विधान भवनात सात दिवस मुक्कामी होते. डीपीएस पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन गुल्हाने यांच्या पथकाने ही कारवाई करत गांजाचा साठा जप्त केला आहे.फिरोजा इजाज पठाण (३८) आणि आसिफ अली शौकत अली (५०) अशी गांजा तस्करी करणाऱ्या दोघांची नावे आहेत.

पथकाला फिजोजा हिच्या घरातून हा २ किलोग्रॅम गांजा सापडला आहे. यातला आसीफ अली हा गांजा खरेदी करण्यासाठी आला होता. तोही अंमली पदार्थाचा तस्कर असल्याचा पोलिसांना संशय आहे. हा गांजा या महिलेपर्यंत पोहोचवणारा मुख्य सूत्रधार वसीम उर्फ गब्बर अब्दुल रफिक पठाण आणि बंडू यादव हे सराईत गुन्हेगार आहे. या प्रकरणात दोन्ही आरोपीचा शोध सुरू आहे.

: मुलखावेगळी माणसं :

## पत्रकार महेश उपदेव यांनी छंदापोटी ३९ वर्षात जमविले ९ हजार पेन!

पत्रकार आणि लेखणी यांचा संबंध जीवाभावाचा. पूर्वी अनेक जण शाईचे पेन वापरीत असत. अताही काही जण शाईचे पेन वापरतात. परंतु ही लेखणी जमविण्याचा छंद जोपासणारे विरळेच.

नागपूर येथील ज्येष्ठ पत्रकार महेश उपदेव यांनी हा छंद जोपासला असून गेल्या ३९ वर्षांत त्यांनी तब्बल ९ हजार लेखण्या जमविल्या आहेत. लहानपणापासून महेश यांना आपल्याजवळ चांगला पेन असावा असे वाटत होते. तेंव्हा परिस्थितीमुळे चांगला पेन मिळू शकला नाही. पेन विकत घ्यायला पुरेसे पैसे पण नसायचे. शाईच्या पेनची निब तुटली तर दुसरी निब वडील आणून देईपर्यंत पेन्सिलने काम करावे लागायचे.



पण सुदैवाने त्यांच्यावर ती वेळ आली नाही. त्यांचे बाबा नीबची डबीच आणून द्यायचे.तेंव्हापासून आपल्याजवळ चांगला पेन असावा अशी इच्छा होती. बास्केटबॉलचा पंच झाल्यानंतर किंवा इतर राज्यात स्पर्धा खेळायला गेले कि त्यांची नजर कोणत्या गावात किंवा राज्यात नाविन्यपूर्ण पेन मिळतो याकडे असायची. आयुष्याच्या एका वळणावर महेश जी पत्रकार झाले. पत्रकाराचे खरे शस्त्र असते ते म्हणजे पेन. पेन संग्रहित करणे हाच त्यांचा छंद झाला.

आज संगणकाचे युग आले असले तरी पेनाची किंमत कमी झालेली नाही. खिशात पेन असायलाच हवा. पेनची जागा आजही कोणतीही वस्तू घेऊ शकली नाही. गेल्या ३९ वर्षात त्यांच्या

लोकमानस

संग्रही ९ हजारांपेक्षा जास्त पेन जमा झाले आहे. आज त्यांच्याजवळ बोरू, टाक पासून अत्याधुनिक पेन संग्रही आहेत. याचे जतन करणे जिकरीचे झाले आहे, पाच रुपयापासून दहा हजार रुपयापर्यंतचे पेन संग्रही झाले असून तीच महेश यांची खरी श्रीमंती आहे.

महेश यांच्या पेन संग्रहात एबोनाईट, हिरो, पारकर, क्रॉस, शेफर्ड, वॉटरमॅन, झेब्रा, मित्सुबिशी, लॅबे, रोटरिन्क, आर्किड, सिनेटर, रायटर, फ्लेयर, एडींग, बॉयर, कोपर्गट, कॅमलिन, लारा, रिटायर, हेलिकस, युनिबॉल इत्यादी देशी-विदेशी नामांकित कंपन्यांचे पेन संग्रहित आहेत.

लहानपणी बाबांनी त्यांना टाक व भाला निब आणून दिली होती. ती आठवण ते विसरू शकत नाही. बाबांचे अक्षर वळणदार व मोत्यासारखे होते. त्यामुळे त्यांचे सांगणे असायचे की आपले अक्षर चांगले आणि वळणदार असले कि समोरच्या व्यक्तीवर आपला चांगला प्रभाव पडतो. त्यांनी दिलेला मंत्र त्यांनी आजही जपला आहे.आंध्रप्रदेशातील हैद्राबाद सारख्या शहरात प्रचलित असलेला एबोनाईटचा पेन चलनातून दूर गेला असला तरी तो त्यांच्या संग्रही आहे.

हा सर्व छंद महेश यांना मिळालेल्या मानधनातून जपला आहे. विविध रंगाचे विविध आकाराचे आखूड तर काही लांब, काही चपटे तर काही फुगीर काही पेन निस्तेज, शाईचे, बॉलपेन माझ्या संग्रही आहेत. वृत्तपत्रात काम करीत असल्यामुळे वृत्तपत्राच्या कागदाने गुंडाळी करून त्यात रिफील टाकून तयार केलेला पेन माझ्या संग्रही आहे. या पेन संग्रहावर आजपर्यंत ९ ते १० लाख रुपये खर्च झाले आहेत. महेश यांच्या पेन संग्रहाची दखल आजतक, स्टार माझा व अनेक वाहिन्यांनी घेतली होती.

■ ■ ■

## जॉर्जियामध्ये लाग्रेंज क्रिकेट स्टेडियमचे उद्घाटन




अमेरिकेतील क्रिकेटच्या वेगवान वाढीला आणि विकासाला एक मोठे प्रोत्साहन मिळाले, जेव्हा जॉर्जियामधील अटलांटाजवळ असलेल्या लाग्रेंज येथे लाग्रेंज क्रिकेट होल्डिंग्जद्वारे विकसित करण्यात येत असलेल्या अत्याधुनिक लाग्रेंज क्रिकेट स्टेडियमचे अधिकृत उद्घाटन झाले.

२०२७ मध्ये सुरू होणारे हे स्टेडियम अमेरिकेतील क्रिकेटसाठी एक कायमस्वरूपी घर असेल आणि या प्रदेशात खेळाची उपस्थिती नव्याने परिभाषित करेल. आंतरराष्ट्रीय क्रिकेट मानकांनुसार बांधलेले, ४५ एकर परिसरात पसरलेल्या लाग्रेंज क्रिकेट स्टेडियममध्ये १०,००० कायमस्वरूपी जागा असतील, तसेच मोठ्या प्रमाणावरील खुल्या मैदानी संगीत कार्यक्रम आणि मनोरंजन कार्यक्रमांसाठी आसनक्षमता २५,००० पर्यंत वाढवण्याची लवचिकता असेल. बहु-क्रीडा आणि समुदाय-केंद्रित ठिकाण म्हणून संकल्पित केलेले हे ठिकाण राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सामने आयोजित करण्यास सक्षम असेल, ज्यामुळे लाग्रेंज जागतिक क्रिकेट परिसंस्थेतील एक प्रमुख केंद्र म्हणून स्थापित होईल.

केवळ उच्च-स्तरीय खेळाव्यतिरिक्त, हे स्टेडियम एक आर्थिक आधारस्तंभ आणि प्रादेशिक केंद्र म्हणून काम करण्यासाठी डिझाइन केले आहे, जे पर्यटन, सामुदायिक सहभाग आणि वर्षभर चालणाऱ्या कार्यक्रमांना प्रोत्साहन देईल. ही सुविधा स्थानिक कार्यक्रम आणि सांस्कृतिक उपक्रमांचेही आयोजन करेल, ज्यामुळे तिची भूमिका अधिक दृढ होईल. ■ ■ ■

## ..असा लागला शोध काडेपेटी

आगपेटीचा शोध हा अतिशय सोयीस्कर असा आहे, ज्यामुळे कुठल्याही प्रकारची मेहनत न करता आग पेटवता येऊ शकते. आजच्या काळी आगपेटी ही प्रत्येकाच्या घरी कामात येणारी वस्तू आहे.



मेणबत्ती लावायची असेल नाहीतर लायटर खराब झालं असेलं तरी आपण आगपेटीचा वापर करतो. म्हणजे ज्याने कोणी ह्या आगपेटीचा शोध लावला असेल त्याने खरंच खूप मोठं काम केलं. आज ह्या आगपेटीचा अनेक ठिकाणी अनेक प्रकारे वापर केला जातो.पण ह्या आगपेटीचा शोध कसा लागला हे तुम्हाला माहित आहे का?

पहिली आगपेटीची काडी कशी तयार झाली, त्याचा शोध कोणी लावला हे तुम्हाला माहित आहे का? त्या आधी आपण हे जाणून घेऊ की, आज जी माचिस आपण वापरतो ती कशी तयार केली जाते. तर त्यासाठी सर्वातआधी लाकडाची एक काडी तयार केली जाते. त्यानंतर त्या काडीचा टोकाचा भाग हा वितळलेल्या मेणात किंवा गंधकात बुडवला जातो. त्यावर लाल फॉस्फरसचे मिश्रण लावले जाते. पण ह्या काडीने आग निर्माण करण्यासाठी त्या काडीला आगपेटीवर लावलेल्या रसायनावर घासणे गरजेचे असते. त्यातूनच अग्नीची निर्मिती होते.

३१ डिसेंबर १८२७ ला ह्या आगपेटीचा शोध लावण्यात आला. ह्याचा शोध ब्रिटीश वैज्ञानिक जॉन वॉकर ह्यांनी लावला. पण जॉन वॉकर ह्यांनी शोध लावलेल्या आगपेटीच्या काडीला पेटविण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागायची. आणि ह्याचा वापर करणे देखील कठीण आणि तेवढेच धोकादायक देखील होते. १८५५ साली स्वीडन येथील एका ट्यूबकरने दुसऱ्या रासायनिक पदार्थांच्या मिश्रणातून एक सुरक्षित अशी आगपेटीची कडी तयार केली. ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# तीन वर्षांत १४,५२६ बालमृत्यूंची नोंद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :
राज्यातील सात जिल्ह्यांमध्ये गेल्या तीन वर्षांत १४,५२६ बालमृत्यूंची नोंद झाली. २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, अकोला आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये एकुण १४,५२६ बालमृत्यू झाले.

या आकडेवारीमध्ये सरकारी रुग्णालयात दाखल झालेली अर्भके, ५ वर्षांखालील मुले आणि कुपोषणाच्या प्रकरणांचा समावेश आहे. तसेच आदिवासी बहुल पालघर जिल्ह्यात १३८ अर्भकांचा मृत्यू झाला.



राज्य आरोग्य विभागाच्या नोव्हेंबर २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, २०३ बालके तीव्र कुपोषित आणि २,६६६ बालके मध्यम कुपोषित असल्याचे आढळून आले आहेत. कमी वजनाच्या मुलांचे प्रमाण ०.२३ टक्के नोंदवले गेले, तर १.४८ टक्के मुले मध्यम कमी वजनाच्या श्रेणीत आहेत.

कुपोषण कमी करण्यासाठी राज्य सरकारने एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अनेक उपाययोजना राबवल्या. यामध्ये नियमित आरोग्य तपासणी, पोषण अभियान, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना आणि सुपोषित महाराष्ट्र अभियान यांचा समावेश आहे.

**कमी वजनाची बालके :** हे बालमृत्यूचे सर्वात मोठे आणि प्रमुख कारण आहे. जन्माच्या वेळी बाळाचे वजन २.५ किलोपेक्षा कमी असणे.

**मुदतपूर्व प्रसूती :** गरोदरपणाचे ३७ आठवडे पूर्ण होण्याआधीच बाळाचा जन्म होणे.

कुपोषण : मेळघाट, पालघर, नंदुरबार व गडचिरोली यांसारख्या आदिवासी जिल्ह्यांमध्ये कुपोषण हे बालमृत्यूचे मूळ कारण आहे. जर माता गरोदरपणात कुपोषित किंवा ॲनिमिक (रक्ताची कमतरता) असेल, तर बाळ सुदृढ जन्माला येत नाही.

**संसर्गजन्य आजार :** न्यूमोनिया, अतिसार व जंतुसंसर्ग हे नवजात बालकांच्या मृत्यूचे मोठे कारण आहे. अस्वच्छ पाणी आणि अस्वच्छ परिसर यासाठी कारणीभूत ठरतो.

**वैद्यकीय सुविधांचा अभाव व उशीर :** दुर्गम भागात वेळेवर रुग्णवाहिका किंवा डॉक्टर उपलब्ध होत नाहीत. अनेकदा बाळाला दवाखान्यात नेईपर्यंत खूप उशीर झालेला असतो.

**कमी वयात लग्न व वारंवार बाळंतपण :** कमी वयात विवाह झाल्याने कमजोर बाळे जन्माला येतात.

**अंधश्रद्धा :** आदिवासी भागात भोंदू बाबा किंवा वैद्यांकडे जाण्याचे प्रमाण मोठे आहे.

# जिवंतपणीच काढले आईचे मृत्यू प्रमाणपत्र

## दहा लाख काढून मुलगा फरार

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. १६ :
एका दिवट्या पुत्राने आपली वयोवृद्ध माता जिवंत असताना पालिकेतून तीचे मृत्यू प्रमाणपत्र मिळविले. नंतर तिच्या बँक खात्यातून तिने मुदत ठेवीच्या रूपात ठेवलेले १० लाख रुपये काढून घेतले. दहा लाखांची रक्कम घेऊन तो फरार झाला. यामुळे वयोवृद्ध माता निराधार झाली असून मी जिवंत आहे, हे सिद्ध करण्यासाठी आणि तिला न्याय मिळावा म्हणून पोलीस ठाणे, पालिकेचे आणि कथित नेत्यांचे उंबरठे झिजवीत आहे.



ही व्यथा आहे जळगाव जामोद येथील निराधार झालेल्या कौशल्याबाई कमालसिंग राजपूत यांची. प्रेमसिंग राजपूत या मुलानेच स्वयंघोषित घोषणा पत्रावर जिवंत आईच्या मृत्यूची नोंद बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद नगरपरिषदेत केली. नगर परिषदेने कुठलीही शहनिशा न करता मुलाला जिवंत मातेचे मृत्यू प्रमाणपत्र देऊन टाकले. यावरच न थांबता या मुलाने आईच्या खात्यात जमा असलेले दहा लाख रुपये हडपले आणि गावातून पळ काढला.

कौशल्याबाई यांनी बँकेत चौकशी केली असता बँकेतील दहा लाख रुपये ही त्यांचा मुलगा प्रेमसिंह याने काढून पसार झाल्याची माहिती मिळाली. त्यावेळेस कौशल्याबाईच्या पायाखालची जमीन सरकली. कौशल्याबाई या आता एकट्याच एकाकी जीवन जगत असून मी जिवंत आहे असं त्यांना आपल्या मृत्यूचे प्रमाणपत्र घेऊन पोलीस ठाण्याच्या चकरा माराव्या लागत आहेत.

# मालवणच्या समुद्रात रोवला विजयाचा झेंडा

■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. १६ :
रत्नागिरी जिल्ह्यातील मालवण येथील निसर्गरम्य चिवला बीचवर राज्यस्तरीय समुद्र जलतरण स्पर्धा अतिशय रोमहर्षक वातावरणात पार पडली.

समुद्रातील खवळलेल्या लाटा, प्रचंड प्रवाह आणि दीर्घ अंतर यामुळे ही स्पर्धा केवळ शारीरिक ताकदीचीच नव्हे तर मानसिक खंबीरतेचीही खरी कसोटी ठरली. राज्याच्या विविध जिल्ह्यांतून १२ ते १५ वयोगटातील तब्बल ३०० विद्यार्थ्यांनी या आव्हानात्मक स्पर्धेत सहभाग नोंदवत आपले कौशल्य आजमावले आणि या समुद्र जलतरण स्पर्धेत वर्ध्यातील दोन विद्यार्थ्यांनी मालवणच्या बिचर विजयाचा झेंडा उभारला.

स्पर्धेच्या प्रारंभी विद्यार्थ्यांना सुरक्षेच्या दृष्टीने नावांच्या सहाय्याने किनाऱ्यावर जवळून तीन किलोमीटर अंतरावर समुद्रात सोडण्यात आले. त्यानंतर किनाऱ्याकडे येण्यासाठी तीन किलोमीटरचे अंतर जलतरण करत पूर्ण करायचे होते.

सुरुवातीचा उत्साह ओसरल्यानंतर समुद्रातील वेगवान प्रवाह आणि थकवा यामुळे १२ ते १५ वयोगटातील अनेक स्पर्धकांना एक ते दीड किलोमीटर अंतर गाठल्यानंतरच माघार घ्यावी लागली. मात्र मोजक्याच जिद्दी जलतरणपटूंनी शेवटपर्यंत टिकून राहण्याचे धैर्य दाखविले.

या कठीण स्पर्धेत वर्धा जिल्ह्याच्या दोन विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत जिल्ह्याचा नावलौकिक वाढविला. सौफा इंग्लिश स्कूल, बोरगाव मेघे येथील मारुफ नवाब शेख (वय १४), रा. महादेवपुरा वर्धा तसेच सेंट अँथोनी नॅशनल स्कूल येथील रुद्रा जयश डांगे (वय १४), रा. इसाजी लेआऊट वर्धा या दोघांनीही समुद्रातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करत उत्कृष्ट जलतरण कौशल्याचे दर्शन घडविले.

लाटांशी झुंज देत, दमछाक होत असतानाही त्यांनी हार न मानता तीन किलोमीटरचे अंतर यशस्वीरीत्या पूर्ण करीत किनारा गाठला.

या दोन्ही विद्यार्थ्यांची कामगिरी केवळ वैयक्तिक यश नसून ती वर्धा जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरली आहे. आपल्या या यशाचे श्रेय त्यांनी आई-वडील, कुटुंबीय, शिक्षक आणि प्रशिक्षकांना दिले. त्यांच्या मेहनतीमुळे जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून भविष्यात राष्ट्रीय पातळीवरही हे विद्यार्थी चमकदार कामगिरी करतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

